अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## सख्ख्या भावाच्या खुनाचा प्रयत्न; आरोपीस १० वर्षे सक्तमजुरी

**सोलापूर** : सख्ख्या भावाच्या खुनाचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून धनंजय संभाजी माने (वय ५२ रा.रामवाडी , सोलापूर) यास १० वर्षाची सक्तमजुरी आणि ३ हजार रुपये दंड अशी शिक्षा जिल्हासत्र न्यायाधीश आर. एन. पांढरे यांनी बुधवारी सुनावली. जखमी यांना ७५ हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचेही आदेशात नमूद आहे.

या खटल्यात आरोपीचा भाऊ संजय संभाजी माने (वय ४९) यांचा खुनाचा प्रयत्न झाला होता. फिर्यादी स्मिता संजय माने यांचे मृत सासरे संभाजी रामचंद्र माने यांच्या नावाने पाकणी येथे शेती व रामवाडी येथे प्लॉट आहेत. या प्रॉपर्टीसाठी आरोपी धनंजय हा सतत संजय माने व शांताबाई माने यांना सर्व प्रॉपर्टी त्याच्या नावावर करावी म्हणून धमकी देत होता. २२ ऑगस्ट २०२१ रोजी संजय हे घरी होते. तेवढ्यात त्याचा मित्र परशुराम जाधव व दिलीप मोरे हे फिर्यादी स्मिता माने यांच्या घराबाहेर बोलत थांबले असता आरोपी धनंजय हा तेथे आला. तेव्हा दिलीप याने धनंजय यास विचारणा केली की, आई कोठे आहे तेव्हा धनंजय फिर्यादीच्या सासूच्या नावाने शिवीगाळ करत होता. त्यानंतर सर्वजण गेल्यानंतर फिर्यादीचे पती संजय हे एकटेच स्क्रॅपच्या दुकानात बसले होते. त्यावेळी आरोपी धनंजय हा अचानक खंजीर घेऊन येऊन शिवीगाळ करून प्रॉपर्टीचे वाटणी करतो का तुला खल्लास करतो असे म्हणत संजय यांच्या पोटावर सपासप वार केले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध सलगरवस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्यात सरकारपक्षातर्फे एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले. शिवाय सरकारी पक्षाने मांडलेल्या युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने शिक्षा सुनावली .या खटल्यात सरकारतर्फे ॲड. प्रदिपसिंग राजपूत तर आरोपीच्या वतीने ॲड. राजेंद्रसिंह बायस यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून पोलीस हवालदार एन. आर. रुपनर यांनी मदत केली.

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. १५ जून २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २५६ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

# चिमणी जेसीबीच्या विळख्यात, लवकरच होणार जमीनदोस्त

**सुराज्य/सोलापूर**

विमानसेवेसाठी वादग्रस्त ठरलेले कुमठे येथील श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या 'चिमणी'वर हातोडा उगारण्याच्या प्रक्रियेला बुधवारी पहाटेपासून अखेर सुरुवात झाली. ही प्रक्रिया सलग चार दिवस चालेल, असे सांगण्यात आले. मंगळवारी कारखाना परिसरात जमावबंदीचा आदेश जारी करून पोलिसांनी कारखाना परिसराचा ताबा मिळविला. कारखान्याच्या एक किलोमीटर परिसरात कुणालाही प्रवेश देण्यात आला नाही. जे तावडीत सापडतील त्यांना 'उचल की आत घाल' ही एकमेव भूमिका पोलिसांनी घेतली होती. पोलिसांनी इतका तगडा बंदोबस्त ठेवला होता की, चिमणीच्या बाजूने भूमिका घेणारे गप्पगुमान झाल्याचे दिसून आले.

चिमणी पाडकामासाठी मनपा आणि पोलीस प्रशासनाने प्रचंड गुप्तता बाळगली होती. कारखाना परिसरात सारा लवाजमा तैनात केल्यानंतर बुधवारी पहाटे ५ वाजल्यापासून प्रशासनातर्फे चिमणी पाडकाम प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली. भल्या पहाटेच सोलापूर महापालिका आणि पोलिसांची यंत्रणा कारखान्यामध्ये चिमणी पाडकामासाठी घुसली. कारखान्याच्या परिसरात दीड ते दोन हजार पोलिसांचा बंदोबस्त आहे. सहाहून अधिक ॲम्बुलन्स कारखाना स्थळावर तैनात केले आहेत. चारही बाजूने सर्व रस्ते बंद करण्यात आले आहेत. एक किलोमीटर परिसरात सर्व रस्ते सुनसान आहेत.

दरम्यान, या प्रकियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडलेला नाही. दरम्यान, सिमेंट काँक्रीटची असणारी ही चिमणी पाडण्यासाठी विविध टप्प्यावर बुधवारी दिवसभरात होल पाडले आहेत. जिलेटिनचा स्फोट घडवून ही चिमणी पाडली जाणार नसून ती होल पाडून दोऱ्या आणि तारा बांधून एका बाजूला ओढून पाडली जाणार आहे. दरम्यान बुधवारी चिमणीच्या परिसरात विखुरलेले बगॅस, इलेक्ट्रिक वायरिंग व इतर अडचणींत ठरत असलेला पसारा हटविण्यात आला. सिद्धेश्वर कारखान्याची चिमणी पाडण्याचे आदेश यापूर्वीच राज्य सरकारने दिले होते. पण, कारखान्याने ती प्रक्रिया केली नसल्याने आता प्रशासनातर्फे चिमणी पाडण्यात येत आहे. महापालिकेच्या प्रशासक शीतल तेली-उगले यांनी कारखान्याला ११ जूनपर्यंत चिमणी पाडून घेण्याचे आदेश दिले होते. मात्र दिलेल्या मुदतींत कारखान्याने चिमणी पाडली नसल्याने आता स्वतः प्रशासनाने पाडकाम करण्यासाठी पाऊल उचलले आहे. बुधवारी पहाटे तीन वाजल्यापासून कारखान्याकडे जाणारे चारही बाजूचे रस्ते पोलिसांनी बंद केले. पहाटेच चिमणीचे पाडकाम करण्यासाठी ६ पेक्षा अधिक जेसीबी, तीन मोठे क्रेन कारखाना स्थळावर दाखल झाले होते. तत्पूर्वी कारखान्याच्या शेजारील कामगार वसाहत एक तासात रिकामे करण्याची सूचना पोलिसांनी रहिवाशांना दिली होती. त्यानुसार त्यांना इतरत्र हलवण्यात आले आहे. कारखाना आवारातील चिमणी मार्गावर असणाऱ्या ऊस वाहतुकीच्या ट्रॉली, ट्रेलर जेसीबीद्वारे काढण्यात आले. सकाळी दहा वाजता चिमणीच्या खाली मोठ्या प्रमाणात असलेला बगॅस काढण्याचे काम सुरुवातीला हाती घेण्यात आले. पोकलेन आणि क्रेन साह्याने ते काढण्याचे काम दोन तास सुरू होते. त्यानंतर चिमणीची उंची अधिकृतरीत्या मोजण्यात आली. दुपारनंतर चिमणीच्या बाजूने जेसीबी, पोकलेन लावण्यात आले. सायंकाळी सहानंतर जेसीबीच्या सहाय्याने धुराटणीचे पार्ट काढण्याचे काम सुरू करण्यात आले.

## खाक्या दाखवून आंदोलकांना पांगवले

### कर्मचारी, आंदोलकांना इतरत्र हलवले

कारखाना प्रवेशद्वारात असणाऱ्या कर्मचाऱ्यांना बाहेर काढले. तर, काहींना पोलीस वाहनात बसवून बाहेर नेले. काही कर्मचाऱ्यांची राहण्याची व्यवस्था एसआरपी कॅम्प तर आंदोलकांना शहरातील सेवासदन शाळेजवळील मंगल कार्यालयात हलवण्यात आले आहे. नेहमी कामगार, ऊस मजूर यांच्या वर्दळीने गजबजणाऱ्या कारखाना परिसरात, पोलिस शीघ्र कृतिदल व अजस्त्र यंत्रणांच्या हालचाली सुरू आहेत.

### गेट तोडून पोलीस कारखान्यात घुसले

सकाळी पोलीस आयुक्त राजेंद्र माने कारखाना स्थळावर पोहोचले, त्यावेळी कारखान्याचे गेट बंद होते. पोलिसांनी कामगारांना गेट उघडायला सांगितले. मात्र प्रतिसाद न मिळाल्याने अखेर नाईलाजाने पोलिसांनीच गेट तोडले. कारखान्याच्या मागील बाजूचे गेट जेसीबीने अक्षरशः उचकटून रस्ता मोकळा करण्यात आला. या कामासाठी दोन तास लागले.

### राजकीय नेत्यांचा कारवाईला विरोध

चिमणी पाडकाम कारवाईचा शहरातील राजकीय नेत्यांनी विरोध केला. माजी आमदार आडम मास्तर, माजी महापौर महेश कोठे, माजी नगरसवेक सुरेश पाटील, प्रा. अशोक निंबर्गी, चेतन नरोटे, विजयकुमार हत्तुरे आदींनी ही कारवाई चुकीचे असल्याचे सांगितले. तर शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एकत्र येत कारवाईचा निषेध केला.

### वरिष्ठ अधिकारी तळ ठोकून

चिमणी पाडकामावेळी परिसरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये व कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलीस प्रशासनातील मातब्बर वरिष्ठ अधिकारी पहाटेपासूनच कारखानास्थळी तळ ठोकून होते. संपूर्ण दिवसभरात पोलिस आयुक्त राजेंद्र माने, उपायुक्त विजय कबाडे, गुन्हे शाखेच्या दिपाली काळे यांच्यासह अनेक पोलिस अधिकाऱ्यांनी कारखानास्थळाला भेट दिली.

### पोलिसांनी १३५ जणांना नोटीस देऊन सोडले

कारखान्यात आंदोलन करणाऱ्या जवळपास १३५ जणांना पोलिसांनी ताब्यात घेऊन तेथून गाडीत बसवून नेले. त्यानंतर सायंकाळी त्या सर्वांना नोटीस देऊन सोडून देण्यात आले.अशी माहिती पोलिस सूत्रांनी दिली.

### राज्य राखीव दलाचे दोन तुकड्या तैनात

कारवाईसाठी पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. यासाठी जवळपास दोन हजार पोलिसांचा बंदोबस्त होता. शिवाय राज्य राखीव दलाच्या सहा ते आठ कंपन्या तैनात करण्यात आले होते. शिवाय ग्रामिण भागात राज्य राखीव दलाचे दोन कंपन्या बंदोबस्तासाठी लावण्यात आले होते.

### चिमणीचे कनेक्शनही जेसीबीने कट केले

चिमणीच्या दरवाज्याजवळ सकाळी जेसीबी पोहोचला. तिथून चिमणीचं कनेक्शनही तोडण्यात आले. पोलीस यंत्रणेला विरोध करण्यासाठी शेकडो कामगार प्रवेशद्वारासमोर थांबले होते. मात्र पोलिसांनी आंदोलकांना उचलले.





कुमठा रोड येथे लावण्यात आलेला पोलीस बंदोबस्त



चिमणी पाडकामासाठी निघालेले पोकलेन...

## विविध ठिकाणी दोघांची गळफास घेऊन आत्महत्या

**सुराज्य/सोलापूर**

शहरातील सलगर वस्ती आणि एमआयडीसी परिसरात दोघांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे नोंद पोलिसात झाली आहे.

शंकर रामचंद्र जेरबंडी (वय ३५ रा. आम्रपाली चौक झोपडपट्टी) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. काल मंगळवारी रात्री ८ वाजेच्या सुमारास त्याने राहत्या घरात वाशाला साडीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून सिद्धाराम (भाऊ) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

या घटनेची नोंद सलगरवस्ती पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. तर दुसरी घटना जुना विडी घरकुल येथे आज बुधवारी दुपारच्या सुमारास घडली गिरीश पुरुषोत्तम कड्याल (वय २९ रा. विडी घरकुल) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. बुधवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास त्याने घरातील छताच्या लोखंडी हुकाला दोरीने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उच्चारापूर्वी मयत झाला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

## पंढरपूर बस स्थानकात महिलेचे दोन लाखांचे दागिने पळविले

**सोलापूर** : येथील बसस्थानकात बसमध्ये प्रवेश करताना गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने सातारा येथील एका महिलेच्या पिशवीतून ५५ ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले. ही चोरी रविवारी दुपारच्या सुमारास पंढरपूर बस स्थानकात घडली.

या संदर्भात पूजा जयसिंग गायकवाड (वय ३६ रा. सातारा) यांनी पंढरपूर शहर पोलिसात फिर्याद दाखल केली. त्या रविवारी दुपारी पंढरपूर बस स्थानकात एसटीमध्ये प्रवेश करीत होत्या. त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या पिशवीतील सोन्याचे आणि चांदीचे दागिने पळविले. असे त्यांच्या फिर्यादी नमूद आहे. तपास हवालदार बनसोडे करीत आहेत

## ट्रकच्या धडकेने बोलेरो उलटून चालक ठार; एक जखमी


**सुराज्य/सोलापूर**

समोरच्या वाहनाला चुकविताना पाठीमागून ट्रक धडकल्याने बोलोरो उलटून चालक ठार तर एकजण जखमी झाला. हा अपघात सोलापूर ते हैद्राबाद मार्गावरील पिंजरवाडी (ता.दक्षिण) सोलापूर येथे मंगळवारी रात्री घडला.

बंदेनवाज म्हताब नदाफ (वय ४५ रा. पिंजरवाडी ता.दक्षिण सोलापूर) असे मयत झालेल्या इसमाचे नाव आहे. ते काल रात्री डब्ल्यूबी-९४ ई-६२५२ या बोलेरो मोटारीतून इटकळ ते पिंजरवाडी येथे आपल्या घराकडे निघाले होते. पिंजरवाडीच्या अलीकडे दोन कि. मी. अंतरावर पाठीमागून एमएच१२-पीव्ही- ८८९५ या क्रमांकाची ट्रक धडकल्याने गाडी उलटून बंदेनवाज नदाफ आणि रूकमदिन नदाफ असे दोघेजण गंभीर जखमी झाले. त्यांना पिंजरवाडी चे उपसरपंच गनी शेख यांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले असता बंदेनवाज हे उपचारापूर्वी मयत झाले. मयत बंदेनवाज नदाफ यांचा सोलापुरात ट्रान्सपोर्टच्या व्यवसाय असून त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे . या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तिकडचं काय अपडेट ?

कल्याण

778-24-158

मेन बाजार

389-05-168

# गुटख्याची बोगस रेड करून दीड लाख पळवले

### तोतया अन्न व भेसळ महिला अधिकाऱ्यासह तिघांना अटक

**सुराज्य/सोलापूर**

आपण अन्न व भेसळ सुरक्षा कार्यालयातील अधिकारी आहोत. अशी थाप मारून आपल्या पथकासह मोटारीतून आलेल्या एका ३७ वर्षीय महिलेने एका पान टपरी चालकाच्या घरावर धाड टाकली आणि गुन्हा दाखल करण्यासाठी १ लाख रुपये रोख आणि सोन्याची अंगठी घेऊन फसवणूक केली. घटना तडवळ (ता. अक्कलकोट) येथे नुकतीच घडली.

या प्रकरणात अक्कलकोट दक्षिणच्या पोलिसांनी अन्न व भेसळची तोतया महिला अधिकारी हिच्यासह चौघांविरुद्ध खंडणी आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल करून तिघांना अटक केली. त्यापैकी दोघांना शनिवार पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश अक्कलकोटच्या न्यायालयाने दिला आहे .

गौरी सिद्धाराम चिन्नुरे (वय ३७ रा. मार्केटयार्ड, बाबा नगर सोलापूर), आफरीन मोहम्मद पटेल (वय ४२ नई जिंदगी, सोलापूर) आणि त्यांचा ड्रायव्हर फिरोज सैपन पठाण (वय ५ रा. अकोले काटी, ता.उत्तर सोलापूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणातील एक महिला फरार असून तिच्या शोध पोलीस घेत आहेत. यासंबंधी पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी, शिवानंद भिमशा कोळी (वय ४५ रा. तडवळ ता. अक्कलकोट) यांचा तडवळ येथे पानटपरीचा व्यवसाय आहे. शनिवार दि. १० जून रोजी दुपारच्या सुमारास डस्टर मोटारीतून गौरी चिन्नुरे हिच्यासह चौघेजण तेथे गेले . आणि आम्ही अन्न व भेसळ सुरक्षा कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचारी आहोत. तुझ्या घरात गुटख्याच्या साठा आहे, असे म्हणून त्यांना घरात घेऊन गेले. आणि चौघांनी मिळून कोळी यांच्या घरात विनापरवाना झडती घेतली. गुटख्याचा साठा मिळाला नाही. मात्र त्यांच्या घरातील तिजोरींत १ लाखाची रोकड मिळाली. ती रक्कम तोतया अधिकाऱ्यांनी घेतली. त्यानंतर तुझ्याविरुद्ध खोटी केस दाखल करते, अशी धमकी दिली. प्रकरण मिटविण्यासाठी तिने २ लाखाची मागणीही केली. तिजोरींतील १ लाख रुपये घेऊन तिने उर्वरित १ लाख रुपयासाठी दोन दिवसाची मुदत दिली. आणि ती रक्कम सोलापुरात आणून देण्यास सांगितले. कोळी यांनी आपल्या जवळ पैसे नाहीत असे सांगितले. तेव्हा तिने लाखाऐवजी ५० हजार रुपये आणून देण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी शिवानंद कोळी यांनी सोलापुरात येऊन त्यांना १० ग्रॅमची सोन्याची अंगठी दिली. पैसे आणि दागिने दिल्यानंतर कोळी यांना हे सर्वजण तोतया अधिकारी आणि कर्मचारी असल्याचे समजले. त्यानंतर त्यांनी अक्कलकोट दक्षिण पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलीस निरीक्षक स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक काकडे यांनी तीन महिला आणि एक पुरुष अशा चौघांविरुद्ध खंडणी आणि फसवणुकीचा गुन्हा दाखल केला. आणि तपास करून वरील तिघा आरोपींना अटक करून गुन्ह्यात वापरलेली डस्टर मोटर देखील जप्त केली.

अटकेतील आफरीन पटेल आणि फिरोज पठाण या दोघांना शनिवारपर्यंत पोलीस कोठडी मिळाली. तर मुख्य आरोपी गौरी चिन्नुरे हिला गुरुवारी न्यायालयात हजर करणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले . पुढील तपास सहाय्यक निरीक्षक काकडे करीत आहेत.



# प्रसार भारतीचे 'फॅड'...

प्रसार भारतींच्या मंत्रालयातून एक जीआर निघाल्याने प्रसार माध्यमांमध्ये खळबळ माजली आहे.दिल्लीतले असोत वा राज्यातले. खळबळ माजली काय? कुणाच्या पोटावर पाय पडले काय? त्याची सरकारी बाबूंना फिकिर बिलकूल नसते. आपली नौकरी जाणार आहे काय? एसी,प्रवास भत्ते,गाड्या घोडे-बंगला ही ऐष कुणी काढून घेणार आहे काय? तेव्हा त्यांच्यात फरक पडण्याची अपेक्षा धरायचीच कशी? प्रसार भारतीने आकाशवाणी पुणे केंद्रातील प्रादेशिक वृत्त विभाग बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबतचा खलिता मंगळवारी जारी करण्यात आला आहे.हा जीआर प्राप्त होताच पुणे आकाशवाणीतील बातमी विभागात जणू अंधारच पसरला. तिथे काम करणारे अधिकारी आणि हंगामी कर्मचारी डोक्याला हात लावूनच बसले.कारण आपली भाकरी हिरावली जाणार हीच चिंता त्यांच्या डोक्यात घुसली.असे का होणार नाही? करोनाच्या काळात संचारबंदीमुळे पत्रकारांची प्रचंड उपासमार झाली.संस्थेतून कामावरून कमी केल्यानंतर अनेकांना घरचा रस्ता धरावा लागला.प्रसार भारतीच्या जीआरमुळे पुणे आकाशवाणीच्या बातमी विभागात काम करणाऱ्यांचे आता पुढे काय होणार? हा गंभीर प्रश्न आहे.त्यांचेच सोडा.त्यांच्या जीववार असणाऱ्या घरातील लेकरा-बाळांचे काय होणार? ज्यांची चाळीशी-पन्नाशी झाली आहे,त्यांनी कुठे म्हणून रोजगार शोधायचा? १९ जूनपासून पुणे वृत्त विभागामार्फत प्रसारित होणारे आकाशवाणीवरील प्रादेशिक आणि राष्ट्रीय मराठी बातमीपत्र छत्रपती संभाजीनगर वृत्त विभागाकडे सोपवण्यात आले आहे. आकाशवाणीवरील पुणे प्रादेशिक वृत्त विभागाकडून सकाळी सात वाजून १० मिनिटांनी होणाऱ्या, एफएम वाहिनीवरील सकाळी आठ, १०.५८ आणि ११.५८, तसेच सायंकाळी सहाच्याही बातम्या आता बंद होणार आहेत. त्याचप्रमाणे सकाळी ८.३० वाजता राष्ट्रीय बातम्यांचे प्रसारणही बंद होणार आहे. या बातम्या आता औरंगाबाद केंद्राहून दिल्या जाण्याची शक्यता आहे. पुण्यातील प्रादेशिक वृत्त विभाग बंद होणार असल्यामुळे या बातम्या तेथे पोचणार कशा, पुण्यातील घडामोडींची दखल औरंगाबादहून कशी घेतली जाणार याबाबत सध्या तरी अनिश्चितता आहे. देशात आकाशवाणीच्या पुणे केंद्राला सर्वाधिक श्रोते आहेत. सुमारे २४ लाख श्रोते नियमितपणे कार्यक्रम ऐकतात. पुण्यातील केंद्राची स्थापना १९५३ मध्ये झाली असून, येथून गेल्या ४० वर्षांपासून बातम्या प्रसारित होत होत्या. वृत्त विभाग बंद होणार असल्याने त्याचे अनेक तोटे समोर येतायेत. आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या दृष्टीने आकाशवाणीच्या प्रादेशिक वृत्त विभागाची बातमीपत्रे महत्त्वाची ठरणार आहेत. परंतु तो बंदच झाला, तर श्रोत्यांचीदेखील मोठी गैरसोय होणार आहे. सरकारी,निम सरकारी,उद्योग व इतर अनेक मोठे जाळे तिथे पसरले आहे. पुण्यामध्ये वारंवार केंद्रीय मंत्र्यांचे दौरे होत असतात. जी-२० परिषदेसारखे महत्त्वाचे कार्यक्रम सातत्याने होत असतात. त्यांचे वार्तांकन करून ते अन्य वृत्त विभागांना, तसेच दिल्लीला पाठवण्याचे काम पुणे वृत्त विभागाद्वारे केले जाते. या निर्णयानंतर पुण्याच्या महत्त्वाच्या बातम्या कशा पद्धतीने प्रसारित होणार हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सध्या हा विभाग एक भारतीय माहिती सेवेचा अधिकारी (प्रभारी), एक वृत्तनिवेदक आणि एक हंगामी वृत्तसंपादक याशिवाय हंगामी वार्ताहर इतक्याच मनुष्यबळावर कार्यक्षमपणे सुरू आहे. दिल्ली मुख्यालयाने विविध प्रसंगांच्या अनुषंगाने अतिरिक्त कार्यभार सोपवल्यास तो सांभाळण्यास हा विभाग सक्षम आहे. असे असताना केवळ पूर्णवेळ भारतीय माहिती सेवेचा अधिकारी उपलब्ध नाही म्हणून पुण्यासारख्या महत्त्वाच्या केंद्रावरील प्रादेशिक वृत्त विभागच बंद करणे हे कोणत्याही दृष्टीने समर्थनीय नाही.पुण्याच्या वृत्त विभागातून राज्याच्या कानाकोपऱ्यातून बातम्या सांगितल्या जातात.विशेष म्हणजे जिल्हास्तरावर आकाशवाणीचे प्रतिनिधी असल्याने त्यांना मानधन स्वरूपात रोजगार मिळत असतो.वृत्त विभागच बंद होणार असल्याने त्यांच्याही रोजगार बुडणार आहे.हे प्रतिनिधी म्हणजे वार्ताहर आणि पत्रकार असतात.प्रसार भारतीची मनमानी वाढत आहे.राज्यातील आकाशीवाणी केंद्राती सर्व स्थानिक कार्यक्रम बंद करून वरिष्ठ आकाशवाणीतील गाण्यांची केवळ पुंगी ऐकवली जात आहे.वास्तविक पाहात लोकल कार्यक्रमांना प्राधान्य द्यायला हवे.पण प्रसार भारतीच्या डोक्यात कोणते फॅड शिरले आहे कोणास ठाऊक?राज्यातील जिल्हा व श्रमिक पत्रकार संघटनांनी यावर आवाज उठवला पाहिजे.लोकप्रतिनिधींनी मोदी सरकारकडे पत्रव्यवहार करून प्रसार भारतीच्या मंत्रालयाला जाब विचारला पाहिजे.मीडियाशी पंगा घेवून चालणार नाही.

## अर्थजगत

**सन २००० नंतर उभारलेल्या झोपड्यांमधील रहिवाशांना केवळ अडीच लाख रुपयांत पक्के घर मिळणार असा निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने जाहीर केल्यानंतर मुंबईतील लक्षावधी झोपडपट्टीवासीयांना दिलासा मिळाला आहे. सन २००० पर्यंतच्या झोपडपट्टीधारकांना मोफत घरे दिली जातात, मग सन २००० नंतरच्या झोपडपट्टीधारकांनी पक्क्या घरासाठी अडीच लाख रुपये कशासाठी मोजायचे, असा प्रश्न यानिमित्ताने विचारला जात आहे. मुंबईसारख्या देशातील सर्वात महागड्या महानगरात झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना मोफत घर देण्याची सवय याच माय-बाप सरकारने लावली आहे. मोफत रेशन, मोफत औषधोपचार, मोफत शालेय शिक्षण, मोफत गणवेश, मोफत वह्या-पुस्तके, गरीब जनतेच्या नावाखाली त्याचे जीवन सारे मोफत करण्यासाठी राज्यकर्ते सतत नवनवीन योजनांच्या घोषणा करीत आहेत आणि धडधाकट माणसालाही पंगू बनविण्याचे ते काम करीत आहेत.**

# झोपडपट्ट्या कमी का होत नाहीत?



येत्या वर्षभरात महापालिका, लोकसभा व विधानसभा निवडणुका अपेक्षित आहेत. गोरगरिबांची व्होट बँक आपलीशी करण्यासाठी सर्व राजकिय पक्षांनी चंग बांधला आहे. आम्हीच तुमचे तारणहार असे भासवत मोफत योजना व सवलतींचा यापुढेही जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पण राज्याच्या हिताच्या व तरुण मुलांच्या भविष्याच्या दृष्टीने मोफत सवलतींचा वर्षाव योग्य आहे का? याचा कुणी गांभीर्याने विचार करीत नाही. एकीकडे जातीपातीच्या आधारावर आरक्षणाची लढाई चालूच आहे. देशात स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा केला जात असताना आरक्षणासाठी वेगवेगळ्या समाजाला संघर्ष करावा लागतो हेच धक्कादायक आहे. मूठभर करदात्यांच्या पैशातून मोफत योजना आणि सवलतींचा वर्षाव किती काळ चालू राहणार यावर संसदेत किंवा विधिमंडळात कधी चर्चा घडवली जात नाही. कारण कोणत्याच राजकिय पक्षांना ती सोयीची वाटत नाही.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आग्रहावरून शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेवर असताना १९९६ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला सुरुवात झाली. मुंबईत अक्राळ-विक्राळ पसलेल्या झोडपडपट्ट्यांमधील रहिवाशांना मोफत घर देणारी ही योजना युती सरकारने सुरू केली. त्यावेळी मुंबईतील चाळीस लाख झोपडपट्टीवासीयांना मोफत घर देणारी योजना म्हणून सरकारने मोठा गाजावाजा केला. गेल्या पंचवीस वर्षांत किती झोपडपट्टीधारकांना मोफत घरे मिळाली, त्यांच्या जागेवर किती उत्तुंग टॉवर्स उभे राहिले? किती जमिनी रिकाम्या झाल्या? किती भूखंड सार्वजनिक उपयोगासाठी उपलब्ध झाले? ज्यांना मोफत घरे मिळाली, त्यांच्यापैकी किती जणांनी ती विकली आणि पुन्हा झोपडपट्टीत राहायला गेले? म्हाडा अस्तित्वात येण्यापूर्वी महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ होते, तेव्हा सर्वसामान्य लोकांसाठी भाड्याची व परवडणारी घरे बांधली जात होती. पण त्या घरांच्या इमारतींच्या देखभालीकडे दुर्लक्ष होत असे. शिवाय भाड्याची थकबाकी कित्येक लाखांत वाढत चालली होती. दुसरीकडे मुंबईत केंद्र व राज्य सरकारच्या जमिनीवर तसेच खासगी जमिनींवरही झोपडपट्ट्या प्रचंड वेगाने वाढतच होत्या. झोपडपट्टीमुक्त मुंबई करण्यासाठीच त्यांना मोफत घरे देण्याची योजना पुढे आली. त्यातून झोपडपट्टी पुनर्वसन योजना अमलात आली. १९८०च्या दशकात शंकरराव चव्हाण हे मुख्यमंत्री, बॅ. ए. आर. अंतुले हे गृहनिर्माणमंत्री व प्रभाकर कुंटे गृहनिर्माण राज्यमंत्री असताना १९७६ मध्ये मुंबईत प्रथमच झोपडपट्टीतील रहिवाशांची गणना झाली. त्यावेळी मुंबईत अठरा लाख लोक झोपडपट्टीत राहात होते, असे निष्पन्न झाले. १९९६ मध्ये एसआरए योजना सुरू करण्याचा निर्णय झाला तेव्हा मुंबईतील झोपडपट्टीवासीयांची संख्या ४० लाखांवर गेली होती. गेली पंचवीस वर्षे एसआरए योजना राबवूनही झोपडपट्ट्या का रोखल्या जात नाहीत? आजही मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये साठ-पासष्ट लाख लोक नरकयातना भोगत जीवन जगत आहेतच. मग हेच का एसआरए योजनेचे फलित म्हणायचे?

एसआरए योजनेखाली झोपडपट्टीवासीयांना मोफत घरे देण्याच्या योजनेच्या मुदतीला राजकिय पक्षांच्या दबावापुढे वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. पण मुदतवाढीची मागणी ही न संपणारी मालिका आहे. अखेर सन २००० नंतरच्या झोपडपट्टीधारकांना अडीच लाख म्हणजेच सशुल्क घर घेण्याचा निर्णय सरकारने घेतला. मोफत घर मिळाल्यावरही ते विकून परत झोपडपट्टीत येणारे हजारो लोक याच मुंबईत आहेत. मग अडीच लाखांच्या घरांचे पुढे काय होणार याचा सर्व्हे सरकारने केला आहे काय?

१९९१ च्या जनगणनेनुसार मुंबईतील २५ टक्के लोक झोपडपट्टीत राहात होते. सन २००१ च्या जनगणनेत ही संख्या ५५ टक्क्यांवर गेली. मुंबईत मोफत घर मिळते असे कळले म्हणून देशातील सर्व राज्यांतून लोक मुंबईकडे निघाले व मिळेल तिथे मिळेल त्या अवस्थेत गलिच्छ वस्तीत राहू लागले. मुंबई वेगाने बकाल होण्यामागे ते एक प्रमुख कारण होते व आजही आहे.

मुंबईतील पूर्व किंवा पश्चिम उपनगरात टू किंवा थ्री बीएचकेच्या फ्लॅटसाठी अडीच ते तीन कोटी मोजावे लागतात. वन रूम किचनसाठीही पन्नास लाख ते एक कोटी दर आहे. मग बेकायदा झोपड्यांमध्ये वर्षानुवर्षे राहणाऱ्या, महापालिकेचे वीज, पाणी फुकट वापरणाऱ्या, महापालिकेच्या मोफत शौचालयाचा लाभ घेणाऱ्या फुकटेकरांना मोफत घर कशासाठी असा प्रश्न विचारला जात आहे. झोपडपट्टीधारकांनो आता अडीच लाख भरा व घर घ्या असे सरकार म्हणते. मुंबईत अडीच लाखांत झोपडपट्टीत फार तर एक झोपडी मिळू शकते, पण सरकार एसआरए योजनेतील ३०० चौरस फुटांचा फ्लॅट देण्यास उदार झाले आहे. हे सर्व कशासाठी? मुंबई महानगराला वेढलेल्या अक्राळ-विक्राळ झोपड्यांना रोखायला जमले नाही, त्याची किंमत करदात्यांच्या खिशातून मोजली जात आहे व पुन्हा अडीच लाखांत फ्लॅटची बक्षिसी दिली जाणार आहे. राज्यकर्त्यांना सत्तेवर असताना कोणताच खर्च येत नाही, त्यांना कोणतीच बिले भरावी लागत नाहीत. बेकायदा झोपडपट्टीत, अनधिकृत इमारतीत वर्षानुवर्षे राहणाऱ्या लोकांवर कसलेच नियंत्रण नाही. जे प्रामाणिकपणे कर देतात, त्यांनाच सारे नियम लागू होतात. पाणीपट्टीपासून विजेच्या भरमसाट बिलांपर्यंत सर्व देणी त्यांना वेळच्या वेळी द्यावीच लागतात.

विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना त्यांनी मुंबईत कुठेही झोपडपट्टी उभी राहिली, तर तेथील वॉर्ड ऑफिसर व पोलीस स्टेशनचे सीनिअर इस्पेक्टर यांना जबाबदार धरले जाईल, असे म्हटले होते. झोपडपट्ट्या सतत वाढतच राहिल्या. प्रत्यक्षात शिपाई किंवा कारकुनालाही कधी कोणी जाब विचारला नाही. स्थानिक लोकप्रतिनिधी, स्थानिक भाई-दादा, पोलीस स्टेशन व महापालिका ऑफिस यांचे आशीर्वाद आल्याशिवाय महामुंबईत कुठेही झोपडी उभी राहू शकत नाही आणि कुठेही रस्त्यावर फेरीवाला बसू शकत नाही. हे उघड गुपित आहे. पण त्याविषयी कोणी बोलत नाही. एसआरए योजनेमुळे बिल्डर्सचा मोठा लाभ झाला, रिकाम्या झालेल्या मोक्याच्या जमिनीवर उत्तुंग इमारती उभ्या राहिल्या. झोपडपट्टीवासीयांना मोफत घरे मिळाली, तिथला मेंटेनन्स परवड नाही म्हणूनही अनेकांनी ती विकून टाकली.

सन २००० नंतरच्या झोपडपट्टीधारकांना अडीच लाख रुपयांत घर मिळणार अशा जाहिराती मुंबईत सर्वत्र झळकत आहेत. प्रधानमंत्री निवास योजनेतील घर मिळण्यासही ते पात्र आहेत, अशीही पुष्टी जोडली आहे. अशा योजनांमुळे झोपटपट्ट्यांची संख्या नियंत्रणाखाली येईल की आणखी फोफावेल? अगोदर मोफत आणि आता अडीच लाखांचे घर हमखास मिळवून देतो सांगणारे दलाल, मध्यस्थ, भाई, दादा, सेटिंग करणारे कर्मचारी यांची आणखी चांदी होईल. सामान्य नोकरदार मुंबईकर कोणी घर देता का घर या आशेवर जगत असतो आणि सरकार झोपडपट्टीवासीयांना हक्काचे घर अडीच लाखांत देणार आहे.

**- डॉ. सुकृत खांडेकर**

## टुडेज् ब्लॉग

# फेरीवाला

माझे बालपण मुंबईतील चाळीत गेले असल्याने तिथले वातावरण अतिशय खेळीमेळीचे होते. तेथील निरनिराळ्या वस्तू विकायला येणारे फेरीवाले हा मोठा कुतूहलाचा विषय असायचा. खासकरून बच्चेकंपनीकरिता पर्वणीच. वस्तू विक्रीकरिता विशिष्ट पद्धतीने सूर लावत आवाज देण्याची फेरीवाल्यांची ती ढब काही वेगळीच होती. रामप्रहरी यायचा तो दूधवाला. रोजचे उकाड्याचे दूध घरोघरी वेळेत पोहचविणारा हा दूधवाला सायकलवरून पांढऱ्या शुभ्र दुधाने भरलेली मोठाली किटली घेऊन येताना दिसायचा. ती भलीमोठी किटली आणि दूध मापून देण्याकरिता असलेले विशिष्ट आकाराचे भांडे पाहताना गंमत वाटायची. त्यानंतर अगदी पाठीला पाठ लावून जशी सख्खी भावंडं येतात त्याप्रमाणे दारोदारी वर्तमानपत्रांचे वाटप करणारा त्यामागोमाग पाव, बटर, खारी विकणारा यायचा. मग काय चहासोबत हा खाऊ मिळावा म्हणून आमचा आईकडे हट्ट असायचा. त्यामुळे बन मस्का, खारी, बटर, नानकटाई घरात आवर्जून हजर असायचे. याचा अर्थ असा नाही की स्वयंपाकघरात वडिलांना डब्याकरिता बनवलेली पोळी भाजी दुर्लक्षित असायची. मुळात ती खाल्ली तरच बाहेरचे पदार्थ दिले जायचे, अन्यथा उपवास ठरलेला.

दुपारचे जेवण उरकून जेव्हा बच्चेकंपनी निवांत असायची बरोबर ती वेळ साधूनच आईसक्रीमची गाडी घेऊन यायचा तो आईसक्रीमवाला. कधी कधी बोरं, चिंचा, आवळे, पेरू विक्रेता यायचा, तर कधी गोड गोड कापसाच्या फिकट गुलाबी पुंजक्याला बालकांच्या नजरेतून जिभेवर रेंगाळत ठेवत तोंडात पाणी आणायला यायचा तो कापूसवाला.



खरी गंमत अशी होती की सर्व लहान मुलांना बाहेरच्या रस्त्यावर कुठला खाद्यपदार्थ विक्रेता आलाय हे घरात बसून कळायचे. त्यामुळे आईबाबांकडून किती पैसे मागायचे हे आधीच ठरलेले असायचे. कधी कधी संध्याकाळ होता होता एखादा भेळवाला, कुल्फीवाला आल्यावर सर्वांची भूक वाढायची. त्यांच्याकडील ती चटपटीत भेळ खाल्यावर मधुर, रसभरीत कुल्फीचा आस्वाद घेताना चौपाटीवर उभं असल्याचा भास व्हायचा..


कुणाचा साखरपुडा असो वा लग्न वा हळदीकुंकू समारंभ किंवा हौस म्हणून का होईना त्यानिमित्ताने दारावर आलेल्या बांगडीवाल्याकडून बांगड्या भरण्याकरिता बायकांची गर्दी व्हायची. त्या घोळक्यात प्रत्येक ललनेच्या हाताच्या मापाची व तिला हव्या त्या रंगाची, नक्षीची बांगडी भरून देण्यात बांगडीवाला मग्न होऊन जायचा. यावरून एक गोष्ट आठवली, खेड्यात एखादा लग्नप्रसंग असला की संपूर्ण वाडीतील महिलावर्गाला वधू अथवा वराच्या घरच्यांनी स्व:खर्चाने बांगड्या भरून देण्याची प्रथा आहे. माझ्या माहेरच्या गावी ती प्रथा आजतागायत सुरू आहे. असे करून एकप्रकारे वाडीतील समस्त स्त्रियांना मानपान देऊन त्यांची मर्जी राखत आपल्या घरच्या कार्यात सहभागी होऊन हातभार लावण्याचे आमंत्रणच दिले जाते.

रोज दारावर भाजी विकायला येणाऱ्या भाजीवाल्या मावशी, मासे विक्रेता, जुन्या चप्पल घेऊन बदल्यात लसूण, रताळी देणारी लसूणवाली, जुन्या कपड्यांवर चकचकीत स्टीलचे भांडे देणारी भांडीवाली वगैरे तत्सम फेरीवाले असोत वा पत्र घेऊन येणारे पोस्टमन काका त्या चाळीचाच एक भाग बनून गेलेले असायचे. आता बऱ्यापैकी चाळींचे रूपांतर मोठमोठ्या इमारतीत झालेय. तिथे फेरीवाल्यांना फिरकण्यास सक्त बंदी असते. काळानुरूप माणसं बदलत गेली व विश्वासार्हता लोप पावू लागली. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून हे नियम लागू होत गेले तसेच आता सुपरमार्केट, फूड बाजारसारखे पर्याय जास्त प्रमाणात उपलब्ध असल्याने लोकांना त्यांची फारशी गरज भासत नाही.

**- कस्तुरी देवरुखकर**

## जन्म हा अखेरचा

# वाणी संतांची



हो कां जयाचिया प्रीती । अमूर्त हा आला व्यक्ती । मज एकवंकी याची स्थिती । आवडतु असे ।।

पहा की, ज्याच्या प्रीतीकरिता निराकार साकार झाला, यावरून मला तर असे वाटते की, या दोघांची स्थिती (देह) जरी भिन्न आहे, तरी दोघे एकरूपच आहेत.

एऱ्हवीं हा योगियां नाडळे । वेदार्थासी नाकळे । जेथ ध्यानाचेही डोळे । पावतीना ।।

एऱ्हवी हा भगवान योग्यांना आढळत नाही, वेदार्थालाही ज्याचे आकलन होत नाही व ज्याचे ठिकाणी ध्यानाची दृष्टी पोहोचत नाही.

तो हा निजस्वरूप । अनादि निष्कंप । परी कवणें मानें सकृप । जाहला आहे ।।

असा जो आत्मस्वरूप, अनादी, अविक्रिय भगवान तो अर्जुनावर किती कृपावंत झाला आहे!

हात्रैलोक्यपटाची घडी । आकाराची पैलथडी । कैसा याचिये आवडी । आवरला असे ।।

हा त्रैलोक्यरूप वस्त्राच्या संकोचविस्ताराचे अधिष्ठान आहे. (त्रैलोक्य हे याचे रूप असून त्याची घडी करून हा अवतार घेऊन आला आहे.) आणि आकाराच्या पलीकडला म्हणजे निराकार असून हा अर्जुनाला इतक्या प्रेमाने कसा स्वाधीन झाला नकळे !

मग देव म्हणे अगा पंडुसुता । हाचि योगु आम्हीं विवस्वता । कथिला परी ते वार्ता । बहुतां दिवसांची ।।

मग श्रीकृष्ण अर्जुनास म्हणाले :- ज्याचा उपाय कर्मयोग आहे असा हा ज्ञानयोग आम्ही पूर्वी विवस्वानाला - सूर्याला सांगितला; परंतु त्या गोष्टीला खूप दिवस झाले.

मग तेणें विवस्वतें रवी । हे योगस्थिति आघवी । निरूपिली बरवी । मनूप्रती ।।

सूर्याने हा सर्व योग वैवस्वत मनूला सांगितला;

मनूनें आपण अनुष्ठिली । मग इक्ष्वाकुवा उपदेशिली । ऐसी परंपरा विस्तारिली । आद्य हे गा ।।

आणि मनूने त्याचे आचरण करून इक्ष्वाकु नामक आपल्या पुत्रास त्याचा उपदेश केला. अशी ही मुळापासून परंपरा चालत आली आहे.

## जनमानस

# लव्ह जिहादचे षडयंत्र !



आज व्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली समाजाच्या बदललेल्या स्वैराचारी रूपामुळे पालकांचे आपल्या पाल्यांकडे दुर्लक्ष होत आहे. आजकाल शालेय अभ्यासक्रमातून योग्य जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेले 'नीतीपूर्ण' शिक्षण शिकवले जात नाही. ना मुलांना मंदिरातून वा इतर कुठूनही धर्मशिक्षण मिळते

अशा वातावरणात राहिल्याने सैरभैर झालेल्या मुली आणि लग्न झालेल्या, मुलेबाळे असलेल्या हिंदू स्त्रिया सभोवार घडणाऱ्या लव्ह जिहाद सारख्या भीषण घटना ऐकूनही खोट्या प्रेमाला खरे मानून त्याला बळी पडतात. हल्लीच्या पिढीचे आदर्श चित्रपटांतील नट नट्या असतात. त्यामुळे त्यांचे स्वैराचारी जीवनमान त्यांना आकर्षित करते.

लव जिहादच्या घटनांमध्ये सर्व पुरावे असतानाही खटला वर्षोनुवर्षे चालू राहतो. अनेकदा आरोपींना जामीनही मिळतो. यामुळे अशा गुन्ह्याविषयीचे भय कमी झाले आहे. जलदगती न्यायालयात लव जिहादचा खटला चालवून तातडीने फाशीच्या शिक्षेची 'जाहीर' अंमलबजावणी करायला हवी. तरच दहशत निर्माण होईल. याचसमवेत तरुणींना स्वसंरक्षण प्रशिक्षण अत्यावश्यक केले पाहिजे, शाळांमधून, मंदिरातून धर्मशिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे. लव्ह जिहाद म्हणजे हिंदूंचा वंशविच्छेद घडवण्याचे नियोजनबध्द षडयंत्र असून त्यावर यंदाच्या गोवा येथे होणाऱ्या हिंदु अधिवेशनात सविस्तर चर्चा केली जाणार असल्याचे वाचनात आले. हिंदु जनजागृती समितीच्या वतीने दरवर्षी गोव्यात हिंदु अधिवेशन भरवले जाते. यंदा १६ जूनपासून सुरू होणाऱ्या या अधिवेशनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**- सौ. स्मिता धुरी, मिरारोड**

# वृद्धांविषयी आपुलकी असावी

आजच्या आधुनिक युगात समाज झपाट्याने बदलत आहे, लोक मोठ्या कुटुंबातून लहान कुटुंबात विभागले जात आहेत. तरुण पिढीला त्यांच्या आधुनिक विचारसरणीचा अभिमान वाटतो, त्यांना वेगळे राहायला आवडते, लोकांना त्यांची वैयक्तिक स्वतंत्र जागा हवी असते. उच्च शिक्षणासाठी, कामासाठी, करियर घडविण्यासाठी बाहेर जायचे आहे. आजकाल, माणूस मोठा झाल्यानंतर,आपला भूतकाळ, वर्तमान विसरून जातो आणि आपल्या भविष्यासाठी जगणे पसंत करतो, म्हणजेच आपल्या वयोवृद्ध आई-वडिलांनी आपल्यासाठी केलेला त्याग, समर्पण, संघर्ष आणि कार्य विसरून तो माणूस फक्त स्वतःच्या आणि मुलांच्या भविष्याचा विचार करू लागला आहे. पण ज्या वृद्ध आई-वडिलांमुळे तो इतका जबाबदार बनला आहे, त्यांनाच तो विसरत चालला आहे, मग अशा परिस्थितीत तो घरातील मोठ्यांची जबाबदारी कोणावर टाकतो आहे. वृद्धांवर अत्याचाराच्या वाढत्या घटनांवर प्रकाश टाकण्यासाठी आणि त्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी जागरूकता म्हणून दरवर्षी १५ जून रोजी जागतिक वृद्ध अत्याचार जागरूकता दिन साजरा केला जातो. या वर्षी २०२३ ची थीम आहे वर्तुळ बंद करणे: वृद्धत्व धोरणात लिंग-आधारित हिंसा, कायदे आणि पुराव्यावर आधारित प्रतिसादांना संबोधित करणे हे आहे.

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशननुसार, ६० आणि त्याहून अधिक वयाच्या ६ पैकी १ व्यक्तीने गैरवर्तन अनुभवले आहे. दीर्घकालीन काळजी सुविधांसारख्या संस्थांमधील वृद्ध लोकांमध्ये अत्याचाराचे प्रमाण जास्त असते. कोरोना महामारीच्या काळात वृद्धांसोबत गैरवर्तन होण्याचे प्रमाण वाढले. वृद्ध लोकांच्या गैरवर्तनामुळे गंभीर शारीरिक दुखापत होऊ शकते आणि दीर्घकालीन मानसिक परिणाम होऊ शकतात. वृद्धांवर गैरवापर वाढण्याचा अंदाज आहे कारण अनेक देश वेगाने वृद्ध लोकसंख्येचा सामना करीत आहेत. ६० आणि त्याहून अधिक वयाच्या लोकांची जागतिक लोकसंख्या २०१५ मध्ये ९०० दशलक्ष वरून २०५० मध्ये अंदाजे २००० दशलक्ष होईल. हेल्पएज इंडियाच्या अहवालानुसार, भारतातील सुमारे ८२% वृद्ध त्यांच्या कुटुंबासोबत राहतात, परंतु त्यांना अनेकदा शाब्दिक अत्याचार, दुर्लक्ष आणि शारीरिक हिंसाचार सहन करावा लागतो. सर्वेक्षणात असे नमूद केले आहे की ३५% वृद्धांना त्यांच्या मुलांकडून अत्याचाराचा सामना करावा लागला आणि २१% वृद्ध लोकांनी त्यांच्या सूनांकडून गैरवर्तन सहन केले. एजवेल फाऊंडेशनने या विषयावर केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की ७३% वृद्ध लोकांनी लॉकडाऊन दरम्यान त्यांच्या घरात विविध प्रकारचे अत्याचार सहन केले.

आज समाजात वृद्धांबद्दलच्या वाढत्या गैरवर्तनाच्या बातम्या सर्वत्र पाहायला-ऐकायला मिळतात, त्यात काळाच्या ओघात झपाट्याने वाढ होऊन अमानवी पातळी गाठली आहे. सोशल मीडियावरही या विषयाशी संबंधित व्हिडिओ व्हायरल होतात. वडिलधाऱ्यांशी गैरवर्तन करणे म्हणजे ते जिवंत असताना त्यांचा यमयातना देण्यासारखे आहे आणि शरमेची बाब म्हणजे हा छळ त्यांचीच लेकरं, माणसे त्यांना करतात.



आज आपल्या समाजात असाही एक संपन्न वर्ग आहे जो मोठ्या शहरात किंवा परदेशात गेला आहे आणि इथे येण्याची वाट पाहत-पाहत त्यांचे आई-वडील आपला प्राण सुद्धा सोडून देतात, तरीही त्यांच्या मुलांना इथे अंत्यसंस्काराला देखील उपस्थित राहायला वेळ नाही. संपत्ती मिळावी किंवा त्यांची सेवा करावी लागू नये म्हणून ज्येष्ठांचा छळ केला जातो. जी मुलं आपल्या मोठ्यांशी गैरवर्तन करतात आणि त्यांना रस्त्यावर भिकाऱ्यांसारखी सोडतात किंवा वृद्धाश्रमात टाकून देतात, जर वडिलधाऱ्यांनीही तारुण्यात हेच काम केले असते आणि या मुलांना अनाथाश्रमात किंवा रस्त्यावर सोडले असते तर कदाचित आज इतके वाईट दिवस वृद्धांना दिसले नसते.

वृद्धांच्या वाढत्या अत्याचाराला आधुनिक जीवनशैली आणि संस्कारहीन समाज जबाबदार आहे. आपले विचार आधुनिक असले पाहिजेत, आपली संस्कृती नाही. मोठी माणसे लहान मुलांसमोर वृद्धांशी गैरवर्तन करतात, मग मोठ्यांची नक्कल करत ती मुलं आई-वडिलांशी गैरवर्तन करतात आणि हे चक्र असेच चालू असते. समाजात चांगुलपणा दाखवणारी मोठी माणसेही घरातील वडीलधाऱ्यांशी गैरवर्तन करताना दिसतात. या वयात ज्येष्ठांना त्यांच्या प्रियजनांच्या पाठिंब्याची सर्वात जास्त गरज असते आणि हीच वेळ आहे आपण त्यांचा खंबीर आधार बनून त्यांच्यासोबत राहण्याची.

आधी आई-वडील मुलांना वाढवतात, मग मुलं मोठी होऊन त्या वृद्ध आई-वडिलांची सेवा करतात, हा आपल्या संस्कृतीचा आणि जीवनाचा नियम आहे. आई-वडिलांना मुलांबद्दल जशी आपुलकी असते तशीच आपुलकी आपल्या वृद्ध आई-वडिलांबद्दल आपली असली पाहिजे. आपली वेळ आणि फायदा निघाल्यावर स्वतःच्या लोकांसोबतचे आपले वागणे बदलणे माणुसकीचे वर्तन नव्हे. पालकांना विनंती आहे की त्यांनी आपल्या प्रिय व्यक्ती किंवा मुलांवर आंधळे प्रेम करू नये, अन्यथा ते तुम्हाला अडचणीत आणू शकते. मुलांचे भविष्य घडवण्यात इतके मग्न होऊ नका की, स्वतःचे भविष्य पणाला लावावे लागेल, म्हणजेच वेळ, काळ आणि परिस्थिती लक्षात घेऊन जीवनातील निर्णय घ्या. कारण अनेक वेळा असे घडते की, मुलांच्या भल्यासाठी आई-वडील स्वतःचा नाश करून सुद्धा मुलांचे आयुष्य सावरतात आणि पुढच्याच क्षणी तीच मुलं आपल्या आई-वडिलांना घरापासून वेगळं करून वृद्धाश्रमात पाठवतात. वृद्धांना अशी वागणूक सतत वाढत आहे, त्यामुळे आता समाजात वृद्धाश्रमांची संख्याही खूप वाढत आहे. आपली नैतिक मूल्ये, संस्कारांना आणि आपल्या आई-वडिलांचा ऋण कधीही विसरू नका, माणूस बना आणि माणुसकीने जगा.

**डॉ. प्रितम गेडाम, नागपूर**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या चिमणी पाडकामाच्या विरोधात

# शेतकऱ्याने पेटविला स्वत:चा ऊस

✔ सुराज्य/अक्कलकोट

सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या चिमणी पाडकामाच्या कारवाईने व्यथित होऊन अक्कलकोट तालुक्यातील बासलेगाव येथील चनबसप्पा कल्लप्पा देखणे या शेतकऱ्याने आपल्या शेतातील दोन एकर उसाच्या फडाला आग लावून निषेध व्यक्त केला.



सिद्धेश्वर चिमणी पाडल्यामुळे काराखानाच राहिला नाही तर ऊस ठेऊन फायदा काय म्हणून शासनाचा निषेध करण्यासाठी स्वतः च्या दोन एकर उसाला आग लावली आहे.

**– बसवराज चनबसप्पा देखणे,(शेतकरी बासलेगांव)**

गेल्या अनेक महिन्यांपासून सिध्देश्वर साखर कारखाना चिमणी पाडकाम प्रकरण संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय बनला आहे.काल रात्री पासुन सिध्देश्वर साखर कारखाना परिसरात जमावबंदी आदेश लागू करण्यात आल्याने सिध्देश्वर साखर कारखान्याकडे जाणारे सर्व मार्ग बंद करण्यात आले आहेत.यामुळे काल रात्रीपासून या मार्गावरुन ये-जा करणाऱ्या सर्व सामान्य माणसांचे हाल मात्र होताना दिसून येत आहे.चिमणी पाडकामाच्या कामाला सुरुवात होताच काही शेतकरी आज सकाळपासूनच आक्रमक होताना दिसून आले आहे.यासाठी अक्कलकोट तालुक्यातील बागेहळ्ळी फाटा, तडवळ भागात देखील मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आले आहेत.यामुळे कुठलाच शेतकरी सिध्देश्वर कारखान्याकडे जाण्याचा प्रयत्न करताना दिसून येत नाही.प्रशासनाने तगडा बंदोबस्त तैनात करण्यात आल्याने शेतकरी व सामान्य नागरिक कारखान्याकडे न जाता अक्कलकोट तालुक्यातील बासलेगांव येथील ऊस उत्पादक शेतकरी स्वत:च्या शेतातील उसाला आग लावून चिमणी पाडकाम विरोधात रोष व्यक्त करताना दिसून आला.

आम्ही सिद्धेश्वर कारखान्याचे सभासद असून गेल्या २४ वर्षापासुन माझ्या वडिलापासुन आम्ही कारखान्यानाला ऊस घालत आलो आहेत.या कारखान्यामुळे आमची आर्थिक स्थिती चांगली झाली आहे. त्यामुळे झालेल्या घटनेचा निषेध करण्यासाठी ऊस पेटवुन दिल्याचे शेतकरी देखाणे यांनी सांगितले.

**मांगीच्या सरपंचासह सोनंद, मुळेवाडी, टाकळीसह ७ ग्रामपंचायत सदस्य अपात्र**

# अतिक्रमण, जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणे, मासिक सभा न घेणे सदस्यांना भोवले

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणे, सार्वजनिक जागेत अतिक्रमण करणे, शौचालय नसणे, मासिक सभा न घेणे अशा १५ तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. या दाखल तक्रारीवर सुनावणी घेऊन आरोप सिध्द झाल्याने मांगी ग्रामपंचायतीचे सरपंचपदासह सोनंद, मुळेवाडी, टाकळी टे. उंबरेपागेच्या ग्रामपंचायत सदरयाचे सदस्य रद्द करण्याची कारवाई केली आहे.

कारवाई करण्यात आलेल्या सदस्यांमध्ये माढा तालुक्यातील टाकळी टे येथील रुपाली आयवळे यांनी शासकिय जागेत अतिक्रमण केले आणि शौचालय नसल्याबाबतची तक्रार अजित घाडगे यांनी दाखल केली होती. त्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. सांगोला तालुक्यातील सोनंद येथील ग्रामपंचायत सदस्य सुविधा ठोकळ यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर केली नाही अशी तक्रार संजय काशीद यांनी दाखल केली होती. तर सोनंद येथील सदस्य असिफ शेख यांनीही जातवैधता प्रमाणपत्र वेळेत सादर केले नाही, अशी तक्रार राजाराम काशीद यांनी केली होती. यावर ही कारवाई करण्यात आली आहे. करमाळा तालुक्यातील वांगीच्या सरपंच निर्माला बागल यांनी मासिक सभा घेतली नाही अशी तक्रार सुजित बागल यांनी घेतली होती. यावर सुनावणी होऊन जिल्हा प्रशासनाच्या वतीने बागल यांचे सरपंचपद रद्द करत सदस्य पद मात्र कायम ठेवले आहे. तसेच पंढरपूर तालुक्यातील उंबरेपागे तीन ग्रामपंचात सदस्याचे पद रद्द केले आहे. कांताबाई शिंदे, माधवी उबाले, मिनल लोंढे असे सदस्य पद रद्द झालेल्यांची नावे आहेत.

आतापर्यंत १८७ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्यामध्ये माढा टे ग्रामपंचायत सदस्य माधुरी माने आणि रूपाली आयवळे यांनी शासकीय जागेत अतिक्रमण, करमाळा तालुकुयातील पोथरेच्या सुधामती नंदरगे यांनी निवडणूक खर्च सादर केला नाही, सांगोला येथील सोनंदच्या सुविधा ठोकळ यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही, माढा तालुक्यातील वेणेगांव अंबुबाई शिरसागर यांनी सरपंच राजीनामा विवाद, पंढरपूर येथून अजनसोंड येथील रूपाली घाडगे आणि इतर दोघांचे सरपंच निवडणूक वाद, मोहोळ येणकी येथील मारूती गुंड यांनी पदाचा गैरवापर केला, अक्कलकोट तोरणीच्या सरपंच निवडीचा वाद होता अशा तक्रारी दाखल झाल्या होत्या यावर सुनावणी होऊन तक्रारदारांचे अर्ज फेटाळून लावले आहेत.

**दक्षिण सोलापूरातील वडापूर ग्रामपंचायत सदस्य कोळी यांचे जातप्रमाणपत्र बनावट असल्याची तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल आह. यावर सुनावणी चालू आहे. मात्र या तक्रारीची सुनावणी अद्याप प्रलंबित आहे.**

# डॉ. लालासाहेब तांबडे यांना अतिविशिष्ट शास्त्रज्ञ पुरस्कार प्रदान

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर येथील कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. लालासाहेब रावसाहेब तांबडे यांना अतिविशिष्ट शास्त्रज्ञ २०२३ हा मानाचा पुरस्कार शेर- ए- कश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठ श्रीनगर, जम्मू कश्मीर येथे दि. १० जून रोजी पाचव्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.



समारोप कार्यक्रमामध्ये जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ व एस. ए. आय. एल. विद्यापीठ कंनसास, यु. एस. ए. चे संचालक आणि भारताचे मिलेटचे ग्लोबल अँबेसिडर डॉ. पी. व्ही. वरा प्रसाद यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास डॉ. शब्बीर वाणी, डॉ.प्रकाश कुमार झा, डॉ. कोटा चक्रपाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल डॉ. तांबडे यांचे अनेक कृषी विद्यापीठाचे कुलगुरू, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे अनेक संचालक, भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्लीचे उप-महा निर्देशक डॉ. यु. एस. गौतम, तसेच राणी लक्ष्मीबाई केंद्रीय कृषी विद्यापीठ झांसी चे कुलगुरू डॉ. एक.के.सिंग व शबरी कृषी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रदीप गायकवाड यांच्यासह समाजातील अनेक मान्यवरांनी विशेष अभिनंदन केले आहे.

श्रीनगर जम्मू कश्मीर येथे दिनांक ९ ते ११ जून रोजी हवामानातील बदल व त्यांचे परिणाम या विषयावर पाचव्या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन शेर- ए- कश्मीर कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विद्यापीठ श्रीनगर, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, कृषी व पर्यावरण विकास सोसायटी उत्तराखंड, कृषी विद्यापीठ रायचूर कर्नाटक, मिड -वेस्ट युनिव्हर्सिटी सुर्खेत नेपाळ व शेर-ए- बांगला कृषी विद्यापीठ ढाका बांगलादेश यांच्या संयुक्त विद्यामाने श्रीनगर येथे करण्यात आले होते.

या परिषदेसाठी डॉक्टर लालासाहेब तांबडे यांना सन्माननीय वक्ता म्हणून निमंत्रितही करण्यात आले होते, त्यांनी लीड स्पीकर म्हणून सदरील परिषदेमध्ये कृषी पर्यटन संकल्पनेचा महाराष्ट्रामध्ये झालेला प्रसार व शेतकरी उत्पादनामध्ये झालेली वाढ याबाबत नाविन्यपूर्ण सादरीकरण केले. आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये भारतासह नेपाळ, बांगलादेश म्यानमार, अमेरिका इत्यादी अनेक देशाचे १२०० पेक्षा जास्त शास्त्रज्ञ व वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष व अभाषी स्वरूपात सहभागी झाले होते.



# स्वामी यांनी शिक्षक – शिक्षिका यांच्याशी साधला संवाद

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यात गुरुवारी १५ जून पासून जि.प.च्या शाळांना सुरुवात होत असून बुधवारी दुपारी सीईओ दिलीप स्वामी यांनी तालुक्यातील शिक्षक - शिक्षिका यांच्याशी संवाद साधला तर गटशिक्षणाधिकारी कुदसिया शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील केंद्रप्रमुख व शिक्षक यांनी पाठ्यपुस्तके व गणवेश वाटप ची तयारी केली आहे.

मराठी शाळांची विद्यार्थ्यांबाबत टक्केवारी वाढावी या संदर्भात गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख, शिक्षक प्रयत्नशील असतील. १५ जून रोजी विद्यार्थ्यांचा शाळा प्रवेश साजरा करण्यात येणार आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेश उत्सव हा आगळ्या वेगळ्या पध्दतीने स्वागत पुष्पगुच्छ देत वाजतगाजत होणार आहे. याचे सर्व नियोजन शिक्षक करतील. गणवेश वाटप संदर्भात मुख्याध्यापक, शिक्षकांना सुचना देण्यात आल्या आहेत. गणवेश वाटप पी. एफ.एम.एस. प्रणाली असुन वेंडर प्रक्रियेप्रमाणे होणार आहे. गणवेश वाटप टप्प्याटप्प्याने होईल.

मराठी शाळांमधून विद्यार्थ्यांची टक्केवारी वाढावी या करिता जि.प.च्या तालुक्यातील सुमारे २५७ शाळांचे ८०० हून अधिक शिक्षक प्रयत्नशील आहेत.

विद्यार्थी हा केंद्रबिंदू आहे. खेडोपड्यातून एकही मुल शिक्षणापासून वंचित राहणार नाही. सर्व मुले शाळेच्या प्रवाहात येतील. येणाऱ्या शैक्षणिक वर्षात जि.प. शाळांमधील गुणवत्ता वाढवण्यासाठी सर्व शिक्षक प्रयत्नशील आहेत.

**– कुदसिया शेख (गटशिक्षणाधिकारी अक्कलकोट)**

# जिल्हाधिकारी कार्यालयात आषाढी वारी गर्दी व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

✔ सुराज्य/सोलापूर

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणच्या माध्यमातून जिल्ह्यातील व्यवस्थापनाची धुरा सांभाळणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण जिल्हाधिकारी कार्यालय येथे पार पडले.

यशदाच्या आपत्ती व्यवस्थापन केंद्राचे संचालक राहिलेले निवृत्त कर्नल व्ही. एन. सुपनेकर यांनी आषाढी वारी कालावधीमध्ये क्षेत्रीय स्तरावर व्यवस्थापनाची धुरा सांभाळणारे अधिकारी यांना घटना प्रतिसाद प्रणाली गर्दी नियोजनाशी निगडीत आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले. त्यांना यामध्ये गर्दी, चेंगराचेंगरी, त्याचे प्रकार, त्याचे रूपांतर मोठ्या आपत्तीमध्ये कसे होते, याची प्रक्रिया, अशा प्रकारच्या आपत्तींचे व्यवस्थापन कसे करावे, त्याची शास्त्रीय पद्धती याबाबत प्रशिक्षण दिले. तसेच, यातून गर्दी व्यवस्थापनाच्या दृष्टीने प्रमाणित कार्यप्रणाली (एसओपी) तयार करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या प्रशिक्षणास निवासी उपजिल्हाधिकारी शमा पवार, प्रांताधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जुन भोसले, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले तसेच नियुक्ती अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या प्रशिक्षणास उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी आदी उपस्थित होते.

यावर्षी आषाढी यात्रेचा मुख्य सोहळा गुरुवार २९ जून रोजी होणार आहे. आषाढी यात्रा कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक येतात. यावर्षी किमान १६ ते १८ लाख भाविक आषाढी वारीस येतील, असा अंदाज आहे. या पार्श्वभूमीवर वारकरी भाविकांना सुलभ दर्शन व्हावे, तसेच यात्रा शांततेत व नियोजनबध्द पध्दतीने पार पाडण्यासाठी हे प्रशिक्षण देण्यात आले.

# निवडणूक उपजिल्हाधिकारी वाघमारे यांची रायगडला बदली

सोरटे दक्षिणच्या तहसीलदार, निऱ्हाळी निवडणूक उपजिल्हाधिकारी

✔ सुराज्य/सोलापूर







येथील निवडणूक उपजिल्हाधिकारी भारत वाघमारे यांची रायगडला पुनर्वसन उपजिल्हाधिकारी म्हणून बदली झाली आहे. त्यांच्या जागी शासनाने औरंगाबादचे सहाय्यक आयुक्त गणेश निऱ्हाळी यांची नियुक्ती केली आहे. तर दक्षिण सोलापूरच्या रिक्त असलेल्या तहसीलदारपदी फलटण येथील शेती महामंडळाच्या व्यवस्थापिका उज्वला सोरटे यांची नियुक्ती झाली आहे.तर तहसीलदार पदावरून उपजिल्हाधिकारी पदावर पदोन्नती झालेल्या अंजली मरोड यांची वर्धा जिल्ह्यात पुनवर्सन अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे. त्यांनी वर्धा येथे जाऊन पदभार स्विकारला आहे.

दक्षिण सोलापूरचे तत्कालीन तहसीलदार अमोल कुंभार यांची पुनर्वसन तहसीलदार पदी बदली झाल्यानंतर त्यांच्या जागेवर कुणालाही नियुक्ती देण्यात आली नव्हती. दक्षिण सोलापूर तहसीलदारपदाचा अतिरिक्त पदभार यापूर्वी नायब तहसीलदार दत्तात्रय गायकवाड आणि त्यानंतर मंद्रूपचे तहसीलदार राजशेखर लिंबारे यांच्याकडे देण्यात आला होता. सध्या लिंबारे हे तहसीलदारपदाचा कार्यभार सांभाळत होते. आता त्या ठिकाणी सोरटे यांची नियुक्ती झाली आहे.

अप्पर तहसील कार्यालयाच्या प्रथम तहसीलदार म्हणून उज्वला सोरटे यांनी काम पाहिले होते. तत्कालीन उपविभागीय अधिकारी क्रमांक एक हेमंत निकम यांची बदली झाल्यानंतर अनेक महिन्यांपासून या ठिकाणी अधिकारी आला नव्हता सध्या पदभार महसूल उपजिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांच्याकडे होता. त्या पदावर नियुक्तीच्या प्रतीक्षेत असलेले सदाशिव पडदुने यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# नरखेड येथे दोन घरातील सव्वा दोन लाखाचे दागिने लंपास

✔ **मोहोळ** : नरखेड ता मोहोळ येथे कडी उघडून घरात प्रवेश करून दोन लाख तीस हजार रुपयांचे सोन्याचे दागीने व रोख रक्कम चोरून नेले असल्याची फिर्याद अमरजित आत्माराम पाटोळे यांनी मोहोळ पोलिस ठाण्यात दिली आहे

अमरजित आत्माराम पाटोळे यांचे कुटूंब रात्री १० वाजणेच्या सुमारास जेवण खान करून झोपी गेले पहाटे साडेतीन वाजता वडीलांनी आवाज दिला म्हणून ते खाली आले व वडीलांना काय झाले असे विचारले असता त्यांनी दरवाजा उघडा असल्याचे त्यांना दाखवले रखवाजाची कडी उघडून घरात प्रवेश करून यावेळी घरातील कपाट उघडे दिसले. कपाटातील ६० हजार रुपये किंमतीचे एक तोळ्याची सोन्याची चैन ४० हजार रुपये किंमतीचे अर्ध्या तोळ्याची एक चैन व अर्धा तोळ्याची एक चैन ८० हजार रुपये किमती च्या अंग दोन अंगठ्या तसेच शेजारील सुरेश मोरे यांचे घरातील ५० हजार रुपये रोख रक्कम असा एकून दोन लाख ती स हजार रुपयाचा माल चोरट्यांनी चोरून नेला.

# सिद्धेश्वर कोरे यांचे निधन



✔ **सोलापूर** : श्रीशैल नगर येथील रहिवासी सिध्देश्वर चंद्रकांत कोरे (वय ६१) यांचे बुधवारी रात्री आकस्मिक निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा गुरुवारी सकाळी १०.०० वाजता राहत्या घरातून निघणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे.

# आ.यशवंत माने यांचा श्रेय लाटण्याचा प्रयत्न : क्षीरसागर

✔ सुराज्य/मोहोळ

भाजपाच्या सरकारने मंजूर केलेली कामे स्वतः मंजूर करून घेतली असे दाखवून राष्ट्रवादीचे आमदार आ. यशवंत माने हे श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत. आणि जनतेची दिशाभूल करित आहेत असा आरोप महाजनसंपर्क अभियान विधानसभा संयोजक सुशिल क्षीरसागर आणि भाजपा मोहोळ तालुकाध्यक्ष सुनिल चव्हाण यांनी भाजपाच्या वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ९ वर्षात केलेल्या विकास कामाची माहीती देण्यासाठी आणि मोहोळ मतदार संघात पक्षाच्या वतीने घेत असलेल्या कार्यक्रमाची माहीती देण्यासाठी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते

याप्रसंगी बाळासाहेब पाटील, तालुका संघटन सरचिटणीस महेश सोवनी, जिल्हा उपाध्यक्ष नागेश मेजर क्षीरसागर, शशिकांत गावडे, दिपक गवळी तालुका सरचिटणीस विष्णू चव्हाण, प्रज्ञावंत आघाडीचे जिल्हा सह संयोजक अविनाश पांढरे, सागर लेंगरे आदीसह पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी मोहोळ विधानसभा मतदारसंघ संघात राबविण्यात येत असलेल्या अभियानाचा प्रारंभ १ जुन रोजी करण्यात आला आसून जुलै पर्यत वेगवेगळे कार्यक्रम राबवले जाणार आहेत याची माहीती माध्यमांना देण्यात आली. यात संपर्क से समर्थन, विशाल जाहीर सभा, पत्रकार परिषदा, सोशल मिडीया वरील प्रभावशाली व्यक्तींचा मेळावा, व्यापारी संमेलन, विकास तीर्थ, ज्येष्ठ कार्यकर्त्यांसमवेत स्नेहभोजन व संवाद, लाभार्थी संमेलन, आंतरराष्ट्रीय योग दिन, पंतप्रधान नरेंद्र मोदी व्हिडिओ कॉन्फरन्स घरोघरी संपर्क असे कार्यक्रम राबविलेजात आहेत याची माहीती देण्यात आली.

**CHANGE IN NAME**

I am Lalita Rajendra Thombre Age Years:40. Occupation:- Housewife At. Post Khamgaon, Tal. Barshi, Dist.Solapur hereby declares that my maiden name was Leela Rajendra Thombare but my name has been changed to Lalita Rajendra Thombre from Today onwards my name shall be assumed as Lalita Rajendra Thombare.

Notary No.020612023/13/6/2023
Changed Name-Lalita Rajendra Thombre Age:- 40 Years Address. Khamgaon, Barshi Dist. Solapur

**अक्कलकोट नगरपरिषद अक्कलकोट**

जाहीर निविदा प्रसिद्धीकरण

जा.क्र.२०२३/न.प.अ.कोट/विद्युत-/संकलन-१/कावि-३७ आरआर-
दि.१४/०६/२०२३

याद्वारे तमाम मक्तेदारांना/सेवा पुरविणारे व्यक्ती/संस्था यांना कळविण्यात येते की, अक्कलकोट नगरपरिषदेकडील विद्युत विभागाकडे शहरातील स्ट्रीट लाईट दुरूस्ती करून घेणे. स्ट्रीट लाईटची देखभाल दुरूस्ती करीता लागणारे सामान देणे घेणे, स्ट्रीट लाईटचे व नगरपरिषद इमारतीचे इलेक्ट्रीक बिल नोंद घेणे व बिल तयार करणे, नागरिकांचे आलेले तक्रार घेवून त्यांची तक्रार निवारण करणे व सद्या ई.ई. एस.एल. या कंपनीचे दुरूस्ती काम पाहणे, वार्षिक निविदातील घेतलेले साहित्य नोंद घेणे, वापरलेल्या ठिकाणीचे खर्च टाकणे व इतर कार्यालयीन कामकाज करीता नगरपरिषदेकडे काम केलेले अनुभवी इलेक्ट्रीक वायरमनची गरज आहे. तरी त्याकरीता मक्ता पध्दतीने योग्य त्या वर्गात नोंदणीकृत व अनुभवी मक्तेदाराकडुन सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. कामा बाबतचा संपूर्ण तपशील शर्ती व अटी कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत (सुट्टीच्या दिवसा व्यतिरिक्त) नगरपरिषद कार्यालयात पहावयास मिळू शकेल. तरी ज्यांना निविदा द्यावयाचे असतील त्यांनी आपली निविदा दिनांक २३/०६/२०२३ रोजी सायं. ४.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात अभिलेख विभागाकडे आणुन द्यावीत किंवा पाठवावेत. मुदती नंतर आलेल्या निविदाचा विचार केला जाणार नाही. कोणतेही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याचा हक्क राखुन ठेवणेत आलेला आहे. त्याची कारणे देणे नगरपरिषदेवर बंधनकारक नाही. यासंबंधी लागू असलेले सर्व सरकारी नियम मक्तेदारावर बंधनकारक राहतील दाखल निविदा शक्यतो दिनांक २३/०६/२०२३ रोजी त्याचदिवशी सायं. ५.०० वा. उपस्थित मक्तेदार अगर त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचेसमोर उघडणेत येतील.

सही/-
(सचिन पाटील)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगरपरिषद अक्कलकोट

# विनापरवाना डिजिटल बॅनर लावाल तर होणार कारवाई

## महापालिका आयुक्तांनी काढले आदेश; दरही केले जाहीर

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेच्या हद्दीत कोणतेही डिजिटल बॅनर होर्डिंग व जाहिरात लावण्यासाठी निश्चित केलेली फी रक्कम भरून महापालिकेच्या भूमी मालमत्ता व संबंधित विभागीय कार्यालयाची रीतसर परवानगी घेणे आवश्यक आहे. अन्यथा दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई करण्यात येईल. सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण टाळण्यासाठी याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी काढले आहेत.

सोलापुर शहरातील विविध चौकात सण, उत्सव व वाढदिवसाचे बॅनर लावण्यात येत आहेत. सदरचे बॅनर हे विनापरवाना असुन त्यामुळे वाहतुकीस अडथळा व सार्वजनिक मालमत्तेचे विद्रुपीकरण होत आहे. त्या अनुषंगाने महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी अनाधिकृत बॅनर,होर्डिंग, जाहिरात यावर आळा घालण्यासाठी आदेश जारी केले आहेत. शहरात बॅनर, होर्डिंग, जाहिरात करण्याकरिता दर निश्चित केले आहेत. यासाठी महापालिका भुमी व मालमत्ता कार्यालय व संबंधित विभागीय कार्यालयाकडून निश्चित केलेली रक्कम भरून परवानगी घेणे आवश्यक आहे. नागरिकांनी विहित नमुन्यातील अर्ज, वाहतुक शाखेचा ना हरकत दाखला घेऊन संबंधित कार्यालयाकडे परवानगी करिता अर्ज करावेत.

दर खालीलप्रमाणे -इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले व फिरते जाहिरात इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले - १००/- प्रति चौ. फुट / प्रति दिन, जाहिरात / निर्देश फलक र.रु. १५०/- प्रति चौ.फुट / प्रति महिना फिरते जाहिरात डिस्प्ले - र.रु. २०/- ते र.रु. २००/- प्रति चौ. फुट / प्रति महिना किऑस्क (विद्युत पोलवरील जाहिराती) - रु.२०५/- प्रति महिना / प्रति पोल सायकल वरील जाहिरात मोफत, भिंतीपत्रक / भिंतीवर चिटकविलेली जाहिरात परवानगी नाही भिंत / रस्त्यावरील लिखाण परवानगी नाही स्वागत कमान र.रु. ५००/- प्रति दिवस / प्रति कमान, निशाण / बॅनर / होर्डिंग- र.रु.०५/- ते र.रु. ५००/- प्रति चौ. फुट / प्रति दिवस रोड शो रस्त्यावर / चौकात / मोकळ्या जागेत र.रु. २०००/- ते र.रु. ५०००/- प्रति दिवस, वाहनावर लाऊड स्पीकर लावुन जाहिरात करणे र.रु. १०००/- प्रति वाहन / प्रति दिवस

**परवानगी न घेता फलक लावल्यास पाचपट दंड**

परवानगी न घेता बॅनर, होर्डिंग, जाहिरात लावल्यास जाहिरात रकमेच्या पाच पट दंड आकारण्यात येईल व त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल. बॅनर,होर्डिंग, जाहिरात च्या दर्शनी भागावर महापालिकेकडुन घेतलेली परवानगी लावण्यात यावे. अन्यथा कारवाई करण्यात येणार आहे, असा इशारा आयुक्त शितल तेली उगले यांनी केले आहे.

।। श्रद्धावॉल्लभत्ते ज्ञानम् ।।

**उन्नती शिक्षण प्रसारक मंडळ**
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर. पिन- ४१३२९६

**प्रवेश देणे चालू आहे**

**महात्मा ज्योतिबा फुले वसतिगृह, दहिटणे व ज्ञानगंगा प्रशाला, दहिटणे**
ता.अक्कलकोट, जि.सोलापूर

-: वैशिष्ट्ये :-
१) इ. ५ वी ते १० वी पर्यंतच्या मागासवर्गीय एस.सी/एस.टी./व्ही.जे.एन.टी./ओ.बी.सी. व आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश देणे चालू आहे.
२) विद्यार्थ्यांसाठी प्रशस्त राहण्याची सोय.
३) दोन वेळा जेवणाची व नाष्ट्याची सोय.
४) वैद्यकीय उपचाराची सोय.
५) संगणक सुविधा.
६) मोफत शालेय गणवेश.

**प्रवेशासाठी कागदपत्रे**
१) २ रंगीत फोटो
२) आधार कार्ड
३) शाळेचा दाखला
४) रहिवाशी दाखला

– संपर्क –

**तानाजी सुरवसे**, मुख्याध्यापक, ज्ञानगंगा प्रशाला, मो.९८३४८०७२४०
**स्वामीराव मोरे**, अधीक्षक, महात्मा ज्योतिबा फुले वसतिगृह, मो.८६६८७४८४४५
**गुरुप्रसाद पाटील**, सचिव, उन्नती शिक्षण प्रसारक मंडळ, मो.७०५७४६९२७८

**खरात सर - मो.९८२३३५१४१८**

# धूरमुक्त गाव अभियानाचे नेतृत्व प्रिसिजनने करावे : डॉ. देवधर

✔ सुराज्य/सोलापूर

**प्रिसिजन फाउंडेशन, भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठान व सोलंकरवाडी ग्राम पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने सोलंकरवाडी ग्राम पंचायत येथे बायोगॅसचे उद्धघाटन झाले. त्यावेळी डॉ सुहासिनी शहा यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी बोलताना प्रिसिजनच्या माध्यमातून चालणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. बायोगॅस प्रकल्पाबाबत बोलताना त्या म्हणाल्या कि, बायोगॅस' हा केवळ ज्वलनशील नाही तर माणसाचे मन प्रज्वलित करण्याचे कामही करतो, बायोगॅसच्या स्लरीपासून गांडूळ खत, कंपोस्ट हे सारे तयार केल्यावर शेतकरी खताच्या बाबतीमध्ये इंधनाबरोबरच (बायोगॅस मिथेन) स्वयंपूर्ण होऊ शकतो. हा मन प्रज्वलित करणारा बायोगॅस'आहे. येणाऱ्या काळात बायोगॅसच्या माध्यमातून धूरमुक्त गाव ही चळवळ प्रिसिजन राबवेल.**

सोलंकरवाडी ता माढा, बोलवाडी, शेटफळ (ता. मोहोळ) व चिंचणी ता पंढरपूर येथे बायोगॅस प्रकल्प प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले होते. या शिबिरात ४ तालुक्यातून जवळपास दहा प्रशिक्षणार्थींना आधुनिक मॉडेल बायोगॅस बांधकामाचे प्रशिक्षण देण्यात आले. त्याच दरम्यान या तीनही गावात बायोगॅस बांधण्यात आले. यातील सोलंकरवाडी ता माढा, येथील बायोगॅसचे प्राथनिधीक उद्धघाटन करण्यात आले. त्यावेळी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ सुहासिनी शहा, भगीरथ ग्रामविकास प्रतिष्ठानचे डॉ प्रसाद देवधर, डॉ निशिगंधा माळी (माजी जिल्हा परिषद अध्यक्षा) सरपंच बाळासाहेब पांढरे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रिसिजनच्या पहिल्या बायोगॅसचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले व त्याचे मान्यवरांच्या हस्ते ज्योत पेटवून उद्धघाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माधव देशपांडे यांनी केले. त्यानंतर सोलंकरवाडीचे लाभार्थी शहाजी यादव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे मुख्य वक्ते डॉ प्रसाद देवधर यांनी ग्रामीण भागातील अनेक समस्यांवर बायोगॅस हा एकमेव पर्याय असल्याचे सांगितले.

बायोगॅस' मधून मिळणारे स्वच्छ इंधन हे आर्थिकदृष्ट्या परवडणारे ठरते. ५ माणसांच्या कुटुंबाला साधारणतः १ महिन्याला १ सिलेंडर लागतो, तर एका जनावराच्या शेणावर ४ माणसांचा स्वयंपाक बायोगॅसवर होतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तानाजी इंगळे यांनी केले. सदर कर्यक्रमास उपसरपंच उषा खरात, कृषि पर्यवेक्षक दादासाहेब पवार, कृषि साहयक दिपक शिंदे, ग्रामसेवक दत्तात्रय टोणपे, मुख्याध्यापक रामकृष्ण केदार, शिक्षक अनिल रोकडे, परमेश्वर सुरवसे, पाणी फाऊंडेशन माढाचे समन्वयक सुशांत गायकवाड, जिर्तेंद्र फडतरे, भिमराव मोरे, वामन यादव, माजी सरपंच अनंता गलांडे, बाबासाहेब शेंडगे, बाळासाहेब भांगिरे, रामदास पांढरे, दत्तात्रय माळी, बाबासाहेब माळी, राजाभाऊ पाटील, गोपाळ माळी, अनिल शेंडगे, नवनाथ पांढरे, सुधीर गलांडे उपस्थित होते.

## प्रिसिजनच्या पहिल्या बायोगॅसचे उद्घाटन




सामान्य शेतकऱ्याला दुध न देणारे जनावर पाळणे हे कठीण होत असते, पण बायोगॅस' असेल तर तो ते जनावर आनंदाने पाळतो. कोणत्याही वस्तूची अर्थशास्त्राच्या परिभाषेतील शाश्वतता ही अधिक महत्त्वाची असते. लहानपणापासून वाढविलेले जनावर विकायचे नाही ह्या भावनेला बायोगॅस' मुळे आर्थिक आधार मिळतो. प्रिसिजनच्या माध्यमातून सुरु झालेला बायोगॅसमुळे फक्त गॅसच नाहीतर स्लरीच्या माध्यमातून शेतीसाठी गांढूळ खत ही मिळत आहे.

– **शहाजी यादव** (बायोगॅस लाभार्थी)



## आस्था फाउंडेशनच्यावतीने गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

✔ **सोलापूर** : आस्था रोटी बँक सोलापूर आयोजित पोलीस अधीक्षक श्री विरेश प्रभू यांच्या वाढदिवसानिमित्त गरीब व गरजू १५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

सिविल इंजीनियर राजेश हालकुडे, रंणजीत सोनवणे, अमित कांबळे, मिथुन शाहा, राजू हौशेट्टी , अध्यक्ष विजय छंच्छुरे व मान्यवरांच्या हस्ते गरजु १५० विद्यार्थ्यांना 'इयत्ता पहिली' ते 'दहावीं' शालेय साहित्य देण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पुष्पक पुकाळे, निनाद अक़्तनाळ, स्नेहल वनकुद्रे, विकास कुंदूर, कल्पना कोळी, सुरेखा पाटील आदिंनी परिश्रम केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन छाया गंगणे यांनी केले तर आभार प्रदर्शन योगेश कुंदूर यांनी मानले.

## शनिवारी टेक्स्टाईलवर चर्चासत्र



✔ **सोलापूर** : परंपरागतरीत्या चालत आलेला सोलापुरातील यंत्रमाग उद्योग सुरुवातीला वैशिष्टपूर्ण जेकार्ड चादर आणि नंतर टेरी टॉवेल उत्पादनाच्या सहाय्याने मागील ५०-६० वर्षात मोठी प्रगती केली मात्र अलिकडील काळात तीव्र स्पर्धा, अनेक मोठ्या आणि आधुनिक कॉर्पोरेट उद्योगांमुळे सोलापुरातील यंत्रमाग उद्योगाची प्रगती खुंटली आहे. एकंदर सद्यस्थिती लक्षात घेऊन भविष्याच्या दृष्टीने सोलापुरातील यंत्रमाग उद्योगात काय काय करता येईल, यासंबधी नामांकित टेक्स्टाईल तज्ञ सचिन कुलकर्णी यांचे मार्गदर्शनपर चर्चासत्र टेक्स्टाईल डेव्हलपमेंट फौंडेशन (टी.डी.एफ.) मार्फत येत्या शनिवारी दि. १७ रोजी संध्याकाळी ६.१५ वा. अक्कलकोट रोड एम.आय.डी.सी. येथील टी.डी.एफ. हॉलमध्ये आयोजित केले आहे. सचिन कुलकर्णी यांना वेलस्पन इंडिया, अरविंद मिल्स, आदित्य बिर्ला ग्रुप आदी नावाजलेल्या कंपन्यांसह देश-विदेशातील अनेक ठिकाणी उच्च पदावर काम करण्याचा सखोल अनुभव आहे. या चर्चासत्रास उपस्थित राहण्यासाठी पूर्व नावनोंदणी अनिवार्य आहे.

## प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार

✔ **सोलापूर** : दि महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद शाखा सोलापूर तसेच लोकमंगल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमान सोलापूर शहरातील सर्व शाळातील सर्वप्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. ह.दे प्रशालेच्या मुळे सभागृहात शनिवार दि. १७ जून रोजी दुपारी ३ वाजता हा सत्कार होणार आहे. दहावीच्या परीक्षेत सोलापूर शहरातील माध्यमिक शाळा जे विद्यार्थी सर्वप्रथम आले त्यांचा गौरव होणार आहे. तसेच दक्षिण सोलापूर तालुक्यातील सेवानिवृत्त शिक्षकांचाही सत्कार करण्यात येईल .आज पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली. यावेळी शिक्षक परिषदेचे जिर्तेंद्र पवार, मारुती तोडकर, लोकमंगल चे शशी थोरात ,दिपाली कोठारी, विश्वनाथ कुलकर्णी ,मोहन पाटील आदि उपस्थित होते.

## वरातीत नाचल्याने पत्नीला मारहाण

✔ **सोलापूर** : वरातीत का नाचली या कारणावरून नवऱ्याने बायकोला पट्ट्याने मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे.ही घटना १२ जून रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास वैदवाडी भवानी पेठ शेळगी रोड येथे घडली. याप्रकरणी काजल किरण गुडील (वय-२५,रा.वैदवाडी,भवानी पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाणे फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती किरण गोविंद गुडील,सासरे गोविंद गुडील, दुर्गा गोविंद गुडील (रा.वैदवाडी,भवानी पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.फिर्यादी यांचे पती किरण याने काजल यांना वरातीत का नाचलीस या कारणावरून पट्ट्याने मारहाण केली. त्यानंतर पट्ट्याच्या स्टीलचा बक्कल पायाच्या पंजावर लागून काजल या जखमी झाले आहेत.तसेच फिर्यादी यांची आत्या आणि त्या रामा वरघंटी या भांडण सोडवण्यासाठी आले असता त्यांना देखील सासरे गोविंद यांनी कपाळावर हाताने ठोसा मारून फिर्यादी यांची आई यांना देखील दुर्गा यांनी शिवीगाळ करत हाताने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल पैकेकरी हे करीत आहेत.

## मृत्यूस कारणीभूत ; एकावर गुन्हा

✔ **सोलापूर** : फिर्यादी मारुती रंगनाथ ठाकूर (वय-५५,रा.क्रांतीनगर खारगाव रोड,लातूर) व त्यांची आत्या सरस्वती चंद्रकांत मोरे असे दोघेजण नातेवाईक भगवान शिंदे यांच्या मुलीचे केगाव येथे लग्न उरकून जेवण करून परत आत्याच्या घराकडे जाण्यासाठी निघाले.त्यावेळी केगाव येथील रिक्षा स्टॉप कडे पायी रस्ता क्रॉस करून जाताना सोलापूर पुणे हायवे रोडवर रमेश जगदीश मिरेखोर (रा.सैफुल) याने त्याच्या ताब्यातील दुचाकी क्र.एमएच.१३. डीएच.२६१६ ही दुचाकी भरधाव वेगात व निष्काळजीपणाने चालून फिर्यादी यांच्या आत्याला धडक देऊन गंभीरित्यांत जखमी करून त्यांच्या मृत्यूस कारणीभूत होऊन स्वतःच्या हातास व पायास तसेच पाठीला मुक्कामार लागून जखमी होण्यास कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे.ही घटना १३ जून रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली.या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलीस ठाण्यात झाली असून,या घटनेचा पुढील तपास पोसई भोईटे हे करीत आहेत.

## अन्नछत्रच्या कार्याचे वटवृक्षात रूपांतर : सालीमठ

✔ सुराज्य/अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली ३६ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या छोट्या वृक्षांचे (अन्नदानाचे कार्य) आज वटवृक्षमध्ये रूपांतरण झाल्याचे पाहून मनस्वी आनंद होत असल्याचे मनोगत अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिध्दाराम सालीमठ यांनी व्यक्त केले.

ते तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आले असता न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत तहसीलदार बाळासाहेब सिरसट व मैंदर्गीचे काशिनाथ दिवटे, नागप्पा दुर्गे हे उपस्थित होते.यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, दत्ता माने, सौरभ मोरे, पिंटू दोडमनी, गोटू माने, प्रवीण घाटगे, निखिल पाटील, राजू पवार, प्रसाद हुल्ले, धनंजय निंबाळकर, समर्थ घाटगे, शरद भोसले यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## सुवर्ण ग्रुप माजी विद्यार्थ्यांची ४३ वर्षानंतर अपूर्व भेट

✔ सुराज्य/श्रीपूर



ता . माळशिरस येथिल चंद्रशेखर विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांची सुमारे ४३ वर्षा नंतर भेट झाली या अपूर्व भेटी मुळे प्रत्येकाचा उत्साह व आनंदाने वातावरण भारून गेले .

चंद्रशेखर विद्यालयाचा सन १९८० साली सुवर्ण महोत्सव साजरा झाला होता . नेमकी त्यावेळची १० वी ची या विद्यार्थ्यांची बॅच असल्याने सुवर्ण ग्रुप म्हणून संबोधले गेले . पुणे येथिल कल्पवृक्ष निसर्गो उपचार संस्थेच्या सभागृहात हा मेळावा पार पडला .

गणेश वंदनाने मेळाव्यास सुरुवात झाली. राणी कुलकर्णी हिने स्वागत केले .यानंतर दिवंगत झालेल्या मित्रांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली . तर रवि गरुड यांनी मेळाव्या मागची संकल्पना विशद करताना शालेय जीवना नंतर प्रत्येकाचे क्षेत्र वेगळे झाले बरेच जण कामा निमित दूर दूर वर गेले . परंतु मोठ्या प्रयासाने अशोक शिंगटे याने सर्वांना एकत्रीत करण्याचे काम केले . आज ४३ वर्षा नंतर सर्वांची भेट होत आहे मनस्वी आनंद होत असल्याचे सांगून या पुढे सातत्याने भेटत जावू कारण या माध्यमातून वेगळी उर्जा मिळते असे सांगितले .

दोन सत्रामध्ये झालेल्या कार्यक्रमात ओळख , अनुभव , मनोरंजन व पुढील वर्षी पुन्हा भेटण्याचा निश्चय करून मेळाव्याची सांगता करण्यात आली . या मेळाव्या साठी बाळू जोशी , विजया कुलकर्णी (मुंबई ) शहाजी मोरे ( गार्डी ,पंढरपूर ) विजय धाईंजे ( नाशिक ) अनंत अरगडे, मारूती लोखंडे, राणी कुलकर्णी , संजय उत्पात, सीमा मोकाशी ,गीता कुलकर्णी , शैलजा पाठक , अशोक शिंगटे ,मोहन वेलवकर ,श्रीनिवास देशपांडे मनिषा बेंबळकर ( पुणे ) राजू पाटील , प्रवीण पेंडसे, सुरेश पोखरे ,देवीदास काळे, रमेश मिरस्कर,आनंद ताकतोडे, कुमार वाघमारे, विजय डहाळे , हेमंत दिक्षित, प्रकाश केसकर (श्रीपूर ) द्रौपदी म्हसवडे ( कळघोण , सातारा ) अंशुमती पाटील ( मरवडे , मगळवेढा) सीमा जाशी (नाझरे, सांगोला ) रोहीणी विभूते ( मिरज) रजनी सहस्त्रबुध्दे ( महाड ) उपस्थित होते .




## 'पुलं' नी महाराष्ट्र हसता ठेवला, तर 'आचार्य अत्रे' यांनी विविध क्षेत्रात ठसा उमटवला : प्रकाश यलगुलवार

### नाट्य परिषदेत पु.लं.आणि अत्रे यांना अभिवादन

✔ सुराज्य/सोलापूर

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा सोलापूरच्या वतीने लाडक्या 'पु.लं.'ना आणि महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उभ्या राहिलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील प्रमुख नेते प्रल्हाद केशव अत्रे म्हणजे आचार्य अत्रे. यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

आचार्य अत्रे यांनी आपल्या अष्टपैलू व्यक्तिमत्वाने विविध क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटवला होता. महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उभ्या राहिलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील ते प्रमुख झंझावाती नेते होते. तर पु.लं.नी म्हणजे भाईंनी त्यांच्या बहुरंगी, बहुढंगी व्यक्तिमत्वाने महाराष्ट्र हसवला, हसता ठेवला अन् घडवला देखील. त्यांनी साहित्य आणि कलेच्या प्रत्येक क्षेत्रात मुशाफिरी केली आणि रसिकांना मनमुराद आनंद देत माणुसकीचा आदर्श निर्माण केला. असल्याचे अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदे सोलापूर शाखेचे अध्यक्ष प्रकाश यलगुलवार यांनी आपल्या भाषणात सांगितले.

पु.ल.देशपांडे व प्र.के.अत्रे यांच्या आठवणीने वातावरण मंत्रमुग्ध झाले. सोलापुरातील ज्येष्ठ संगीत संयोजक प्रशांत देशपांडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी त्यांनी पु.ल.देशपांडे यांच्या भारावून टाकणाऱ्या रचना सादर केल्या, तर अशोक किल्लेदार यांनी पु.ल. देशपांडे यांचे सुविचार ऐकवले तर सारिका अग्निहोत्री यांनी पु.ल.देशपांडे यांची एक कविता सादर केली, तसेच नाट्य परिषदेचे जेष्ठ कार्य कारिणी सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी पु.ल. देशपांडे आणि प्र.के.अत्रे यांचे अनेक किस्से सांगुन संपूर्ण वातावरण अत्रे आणि पुलं-मय करून टाकले. या कार्यक्रमाला रसिकांनी भरभरून दाद दिली.

याप्रसंगी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष विठ्ठल बडगंची, प्रमुख कार्यवाह प्रा.जोतिबा काटे, कोषाध्यक्ष विद्या काळे, ज्येष्ठ कार्यकारणी सदस्य आनंद खरबस, व्यंकटेश(राजू )रंगम, अपर्णा जोशी, शांता येळंबकर, मिलिंद पटवर्धन यांच्यासह नाट्यरसिक उपस्थित होते. शेवटी किल्लेदार यांनी आभार मानले.

## अवंती नगरातील रेल्वे अंडर ब्रीज लवकरच वाहतुकीसाठी खुला होणार

### आयुक्तांनी केली पाहणी

✔ सुराज्य/सोलापूर

गेल्या सहा वर्षापासून रखडलेल्या ५४ मीटर रस्त्याला आणि अवंती नगर येथील रेल्वे अंडर ब्रिजला महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी गती दिली आहे. आयुक्तांनी मंगळवारी सकाळी अरविंद धाम येतील रेल्वे ब्रिजच्या कामाची पाहणी केली. लवकरच हा ब्रिज वाहतुकीसाठी सुरू होणार आहे.

जुना पुणे नाका येथील छत्रपती संभाजी महाराज पुतळ्यापासून अवंती नगर आणि तिथून पुढे सीएनएक्स हॉस्पिटल जवळून मंगळवेढा रोड क्रॉसिंग करून पुढे सलगर वस्ती कडे जाणारा हा ५४ मीटर रुंदीचा डीपी रोड आहे. यामध्ये फक्त २१ मीटर रुंदीचाच रस्ता महापालिका सध्या करत आहे. रस्त्याच्या सुरुवातीलाच असलेल्या झोपड्या हटविण्यात आल्या. मात्र इतर काही अतिक्रमण अजूनही काढलेली नाहीत त्यामुळे हा रस्ता अर्धवटच आहे. भैय्या चौकातील रेल्वे ब्रिज १०० वर्ष जुना झाल्याने तो जड वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे हा अवंती नगर कडील ५४ मीटर रस्ता वाहतुकीसाठी खुला झाल्यास एसटी तसेच जड वाहतूक आणि इतर नागरिकांना खूप सोयीचा होणार आहे. याकडे महापालिका आयुक्तांनी लक्ष देणे गरजेचे आहे.

## मोबाईलसह साहित्य चोरले

✔ **सोलापूर** : अज्ञात चोरट्याने फिर्यादी अंजय्या नागनाथ फलमारी (वय-३६,रा. गडगी नगर,जुना विडी घरकुल) यांच्या घराच्या भिंतीवर चढून जिन्याच्या उघड्या दरवाज्यातून आत प्रवेश केला.त्यानंतर चोरट्याने फिर्यादी यांच्या घरातील मोबाईल,स्मार्ट वॉच व पितळी तांबे असा अकरा हजारांचा ऐवज चोरून नेला आहे.ही घटना १२ ते १३ जून दरम्यान गडगी नगर येथे घडली.याप्रकरणी अंजय्या फलमारी यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

## मोहोळ नळ पाणीपुरवठ्याच्या पाईप चोरी प्रकरणात गुन्हा दाखल करा

✔ सुराज्य/सोलापूर

**जि.प. कार्यकारी अभियंता यांचे उप कार्यकारी अभियतांना पत्र**

मोहोळ तालुक्यातील अनगर परिसरात असलेली पाणीपुरवठा योजनेची लोखंडी पाईप कापून चार-पाच महिन्यापूर्वी चोरी करण्यात आली होती. ही घटना मागील दीड महिन्यापूर्वी उघडकीस आल्यानंतर अज्ञात व्यक्ती विरोधात नुकतेच गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत . असे पत्र जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता सुनिल कटकधोंड यांनी मोहोळ उप कार्यकारी अभियंता यांना दिल्या असून, येत्या दोन दिवसात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल होणार आहे. चोरीतील लोखंडी पाईप हे जवळपास ३० लाख रुपये किमतीचे असून लोखंडी पाईप जेसीबीच्या साह्याने खोदून काढून त्याची चोरी करण्यात आली आहे .

मोहोळ येथील प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनेच्या दाबनलिकेची पाहणी करण्यात आली आहे. दाबनलिकेचे मोजमाप अनगर जलशुध्दीकरण केंद्राकडून मोजण्यात आली आहे. त्यामध्ये एकूण लांबी ही ६ हजार २१९ मीटर आहे. त्यामधील ३ हजार %१६ मीटर इतकी पाईप लाईन चोरीला गेलेली आढळली आहे. गावच्या स्थानिकांची चर्चा केली असता हे पाईप लाईन अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याचे आढळले आहे.

सुरुवातीला या प्रकरणात या पाईपलाईनची मालकी कोणाची याबाबत वाद सुरू होता. नगरपरिषदेने या प्रकरणात महाराष्ट्र जलजीवन प्राधिकरणाला पत्र लिहीत विचारणा केली होती. प्राधिकरणाने सदर पाईपलाईन ही आमची नसून जिल्हा परिषदेच्या मालकीची असल्याचे लेखी उत्तर दिले होते. मात्र लोखंडी पाईप चोरी सारखी गंभीर घटना घडल्यानंतरही जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे मोहोळ येथील अधिकारी या प्रकरणात गप्प राहिले होते. या घटनेचा पाठपुरावा केल्यानंतर ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांनी गुन्हा दाखल करावे, असे पत्र मोहोळ येथील उप कार्यकारी अभियंता यांना दिले आहे.

## मिनी मंत्रालयाच्या निवडणुका होत नसल्याने इच्छूकांमध्ये हुरहुर

### दक्षिण तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीला तारीख पे तारीख

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक लांबणीवर पडल्याने निवडणूक लढू पाहणाऱ्या मातब्बरांसह नव्याने तयार झालेल्या इच्छुकाचा चांगलाच हीरमोड झाला आहे. मिनी मंत्रालयाच्या निवडणुकांसाठी हुरहूर लागली असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती सभागृहात लोकप्रतिनिधी म्हणून पाऊल ठेवण्यासाठी अनेक उमेदवार इच्छुक आहेत. निवडणूक लागण्याआधी पासूनच काही मातब्बर उमेदवार पुन्हा नशीब आजमवण्यासाठी तयारी करीत आहेत. तर काही नवीन इच्छुकांनी निवडणूकीची तयारी देखील सुरू केली आहे. त्यासाठी सढळ हाताने गावागावात मोर्चे बांधणी चालू आहे. तर काही उमेदवारांनी कॉंग्रेस-राष्ट्रवादी-भाजप-शिवसेना यांच्या पक्षातील वरिष्ठ मंडळीकडे आपली ताकद असल्याचे वरिष्ठांना जाणवून देत आहेत. आणि आपणच गुलाल उधळणार आहोत, असा आव आणत आहेत.



दरम्यान जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये पहिले जे आरक्षण निघाले त्यात बदल होणार नाही ना या भीतीने काही जण मैदान सोडल्यात जमा आहेत. आता पुन्हा निवडणुका लागल्यास आरक्षण बदलते की तेच राहते याकडे लक्ष ठेवून आहेत.सध्या सर्वत्र राजकिय पक्षांमध्ये गोंधळाचे वातावरण असल्याचे चित्र दिसत आहे. तर दक्षिण सोलापूर तालुक्यातील सहा ऐवजी सात जिल्हा परिषद गट झाले असून त्या सातही जिल्हा परिषद गटाचे आरक्षण महिला आरक्षण झाल्याने अनेक इच्छुक उमेदवार हिरमोड झाला आहे. दुसरीकडे जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुका लांबणीवर गेल्याने पुढे होऊ घातलेला जिल्हा परिषद व पंचायत समिती आरक्षण हे जुना पद्धतीनेच गट व गण असेल व पुन्हा नवीन आरक्षण निघेल अशी चर्चा मात्र तालुक्यात होताना दिसत आहे.

मिनी मंत्रालय म्हणून समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती गट व गणाचे निवडणुका लांबणीवर गेल्याने अनेक राजकिय पक्षातील उमेदवारांनी आपले तलवार म्यान केली असल्याचे चित्र दिसत आहे.




## सुळेवाडी येथील नवीन बस थांब्याचे उद्‌घाटन

**पिलीव** : माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथे गेल्या अनेक दिवसापासून एस टी बसेस थांबत नव्हत्या यासाठी युवा नेते विक्रम सुळे यांनी पाठपुरावा केल्यानंतर याठिकाणी एस टी बसेस थांबा सुरु करण्यात आला .सदरच्या एस टी बस थांबयाचे उदघाटन शिवराज पुकळे, माजी सरपंच नाथा सोलंकर, महादेव सुळे,बाजीराव सुळे,राजु सुळे ,शंकर करे,विक्रम सुळे,शंकर इरकर,श्रीपती सुळे,गजेंद्र बिंडे,नवनाथ माने,जयवंत सुळे,शरद दोलताडे,तानाजी सुळे, लक्ष्मण सुळे,मोहन करे,शिवाजी लेंगरे, बंटी सुळे,तसेच विक्रमदादा सुळे मित्रपरीवार मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.



## शासकीय योजना घरा घरापर्यंत पोहचतील : पाटील

**उ. सोलापूर** : उत्तर तालुक्यातील ३६ गावात शासनाच्या योजना सर्वांच्या सहकार्याने पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे असे मत उत्तरचे गटविकास अधिकारी महेश पाटील ह्यांनी सत्कार प्रसंगी व्यक्त केलं आहे. नवनिर्वाचित गट विकास अधिकारी महेश पाटील हे डोणगाव येथे सदिच्छा भेट दिली. रिपब्लिकन पार्टी आठवले (गटा) उत्तर तालुकाच्या वतीने तालुका अध्यक्ष विठ्ठल वाघमारे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत सदस्य रमेश पाटील, धैर्यशील पाटील, एडवोकेट देवेंद्रजी वाळके, तालुका सरचिटणीस- नानासाहेब गायकवाड, तालुका संघटक- सचिव दत्ता वाघमारे , नामदेव साबळे, मर्याप्पा साबळे, युवक कार्य अध्यक्ष- सागर वाघमारे, युवक संघटक- बाबा मोरे, अमोल वाघमारे यांची उपस्थिती होती.




## युवक आघाडी प्रदेश उपाध्यक्ष किरण धाईंजे यांचा सत्कार

**वेळापूर** : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले संपर्क कार्यालय सोलापूर येथे रिपाइं महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या हस्ते रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया युवक आघाडी महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी किरण विठ्ठल धाईंजे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

यावेळी सोलापूर जिल्हाध्यक्ष सोमनाथ भोसले, जिल्हा सरचिटणीस श्यामसुंदर गायकवाड, माळशिरस तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, जिल्हा खजिनदार विठ्ठल क्षिरसागर, तालुका कार्याध्यक्ष समाधान भोसले, तालुका संघटन सचिव पोपट गेजगे, युवक आघाडी तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, सरचिटणीस प्रवीण साळवे, तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे, तालुका उपाध्यक्ष शेखर सावंत, युवा सचिव राजरत्न नाईकनवरे, श्रीपुर शहर सरचिटणीस विश्वजीत भालशंकर, माढा तालुकाध्यक्ष मारुती वाघमारे, मोहोळ तालुकाध्यक्ष तात्या काळे, तालुका सचिव समाधान भोसले, वेळापूर युवक शहराध्यक्ष स्वप्निल सरवदे, राकेश आडगळे व माळशिरस तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# कुर्डूवाडी शहर यापुढे बंद होणार नाही

## व्यापारी व सामाजिक संघटनेचा निर्णय

सुराज्य/कुर्डूवाडी

**कुर्डूवाडी शहरामध्ये सामाजिक संघटना व विविध व्यापारी संघटनेच्या वतीने कुर्डूवाडी येथील शिवाय चौकात घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये बंद पुकारल्यानंतर कुर्डूवाडी शहर बंद राहणार नसल्याचा एक मताने निर्णय घेण्यात आला.**

या आयोजित करण्यात आलेल्या बैठकीमध्ये अनेक व्यापाऱ्यांनी आपली मते मांडली मात्र या बैठकीमध्ये काही राजकीय पक्षाचे प्रमुख पदाधिकारी यांनी पाठ फिरवली असल्याचे चित्र दिसून आले.

महाराष्ट्रात कोणतेही घटना घडल्यानंतर विविध राजकीय पक्ष व संघटना कुर्डूवाडी शहर बंद ठेवण्याचा निर्णय घेतात. बंद ठेवल्यामुळे हॉटेल मालकांचे साहित्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते तर शेतकऱ्यांचे भाजीपाला विक्री होत नसल्याने तोही खराब होऊन जातो. तसेच किराणा, कापड, ज्वेलर्स, टेलर, जनरल स्टोअर्स, तू तोजन्य पदार्थ व मिठाई आदी व्यापाऱ्यांची मोठी आर्थिक उलाढाल ठप्प होत. या व्यापाऱ्यांनी व्यवसाय करण्यासाठी घेतलेले कर्ज व व्याज हप्ता थांबत नाही. त्यामुळे त्यांचे नुकसान भरून निघत नाही. तर पुकारलेल्या बंद दिवशी व्यापाऱ्याने दुकान उघडे ठेवण्याचे धाडस केले तर त्या दुकानाची तोडफोड होते. याचे नुकसान कोणीही देत नाही. अनेक वेळा तर महिन्यातून दोन वेळा दुकाने बंद ठेवण्याची वेळ आली आहे.

कोरोनामध्ये बाजारात मंदी आली आहे. आणि या बंद ठेवल्यामुळे अधिकच नुकसान होत आहे. तर व्यापाऱ्यांना बंद दिवशी कामगारांना खिशातून पगार द्यावा लागत आहे. तर कुर्डूवाडी शहर बंद असल्यामुळे ग्रामीण भागातील ही नागरिक




शहरात येत नसल्यामुळे व वारंवार बंद राहत असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक खरेदीसाठी कुर्डवाडी शहरात येण्याचे धाडस करीत नाहीत. यामुळे पेट्रोल डिझेल यांचेही विक्रीवर परिणाम होतो. तसेच कुर्डूवाडी जंक्शन असल्यामुळे रिक्षा बंद राहिल्यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागतो तर याच दरम्यान एसटी बस शहरातून गेल्यास तोडफोड होण्याची शक्यता ही यावे नाकारता येत नाही. तर शाळा कॉलेज महाविद्यालय हेही बंद ठेवावे लागतात यामुळे विद्यार्थ्यांचेही नुकसान होत आहे.

बंद पुकारल्यास व्यापाऱ्यांना संरक्षण कोण देणार?

कुर्डूवाडी शहरातील सामाजिक संघटना व व्यापाऱ्यांनी शहर बंद न करण्याचा एकमुखाने निर्णय घेतला मात्र एखाद्या राजकीय पक्षांनी शहर बंद पुकारला तर या व्यापाऱ्यांना संरक्षण कोण देणार व काही अनुचित प्रकार होऊन तोडफोड झाल्यास या व्यापाऱ्यांचे नुकसान भरपाई कोण देणार असा सवाल व्यापारातून विचारला जात आहे.

## व्हॉट्सपवर तक्रार केल्याच्या कारणावरून मारहाण, तिघांवर गुन्हा

सुराज्य/बार्शी

येथील शिवाजी महाविद्यालयाच्या परिसरात लावलेला डिजिटल बोर्ड काढण्यासाठी नगरपालिकेचे मुख्याधिकारी याना व्हट्सपवरून तक्रार केल्याने त्याची दुचाकी आडवून तलवारीने मारहाण व डोळ्यात चटणी फेकून जखमी केल्याप्रकरणी पोलीसात तिघावर गुन्हा दाखल केला आहे.

बोर्ड काढण्याबाबत २७ मेरोजी तक्रार केली होती त्यानंतर तो १० रोजी दुचकीवरून इब्राहिम राजअहमद शेख हा येरमळयाकडे जात असताना बीआयटी कॉलेजच्या चौकात रात्री १० वा. ही घटना घडली.

याबाबत जखमी इब्राहिम शेख ३८ रा.मंगळवार पेठ बार्शी यांनी शहर पोलिसात तक्रार देताच वसीम पठाण ,नयूम पठाण व तिसरा अनोळखी या तिघा विरुद्ध ११ रोजी गुन्हा दाखल केला आहे .

यातील फिर्यादी हा टीव्ही डिश दुरुस्तीचा व्यवसाय करत असून शिवाजी कॉलेज परिसरात लावलेला डिजिटल बोर्ड काढण्याबाबत नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांचेकडे व्हाट्सपवर तक्रार केल्याची माहिती त्यांना समजल्याने बोर्ड लावणारे दोघे तेंव्हापासून चिडून होते.१० रोजी रात्री जखमी दुचाकीवरून जात असताना त्याच्या दुचाकीस कट मारल्याने गाडी थांबविताच त्यानंतर मारेकऱ्यानी येऊन त्यांच्यातील एकाने फिर्यादीस मारून जखमी केले.

## बहुजन विचार मंचच्या वतीने निवेदन

सुराज्य/सोलापूर

नांदेड येथील बौद्ध युवक अक्षय भालेराव याची हत्या करण्या-यांवर ताबडतोब कठोर कारवाई करण्यात यावी आणि अक्षय भालेराव यांच्या कुटुंबीयाना न्याय मिळावा, अशा आशयाचे निवेदन बहुजन विचार मंच च्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

या प्रसंगी बहुजन विचार मंच चे अध्यक्ष आबासाहेब साबळे,डॉ अरूण कुमार इंगळे, प्रा डॉ एम डी शिंदे, व्ही डी गायकवाड, अंबादास कदम साहेब, सर्वोत्तम रणशुर, प्रा उत्तम क्षीरसागर, प्रभाकर जौंजट, अंगद मुके,शिरीष गायकवाड, भाऊसाहेब लंकेश्वर, मनगेनी वाघमारे उपस्थित होते.



## बहुजन आक्रोश मोर्चा कृती समितीच्या वतीने रस्ता रोको

सुराज्य/वेळापूर

दलित अत्याचार घटनेच्या निषेधार्थ वेळापूर येथे पद यात्रेने पालखी चौक येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

वेळापूर येथे बहुजन आक्रोश मोर्चा कृती समिती यांच्यावतीने नांदेड जिल्ह्यातील बोंडार हवेली गावामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी केली म्हणून अक्षय भालेराव यांची गाव गुंडानी हत्या केली तसेच लातूर जिल्ह्यातील रेनापुर येथे सावकारकिच्या पैशातून मातंग समाजातील गिरीरत्न तबकाले या व्यक्तीची रॉडने मारहाण करून हत्या केली तसेच मुंबई येथील उच्च शिक्षण घेत असलेल्या दोन मुलींवरती अत्याचार करून खून करण्यात आला.

यासह महाराष्ट्र मध्ये दिवसेंदिवस दलितांवरील वाढते अत्याचारत रोखण्यासाठी सरकारने तात्काळ उपाययोजना कराव्यात. या खटल्यामध्ये विशेष सरकारी वकिलाची नेमणूक करण्यात यावी आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी हा खटला जलगती न्यायालयात चालवावा,दिवंगत अक्षय भालेराव व गिरीरत्न तबकाले यांच्या सह पिढींचा अत्याचारीत कुटुंबियाला शासनाने आर्थिक मदत तात्काळ द्यावी,त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तिस शासकिय नोकरी देऊन कुटुंबाचे पुनर्वसन करावे,खून प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर फाशीची शिक्षा व्हावी .असे निवेदनात म्हटले आहे.

या मोर्चाला सुरुवात अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून गावातील मेन बाजारपेठेतून पोलीस स्टेशन समोरून पालखी चौक या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रस्ता रोको आंदोलनाला सुरुवात करण्यात आली. यामध्ये विविध संघटनांचे, पक्षाचे, पदाधिकारी, बहुजन समाज बांधव, महिला सहभागी झाल्या होत्या. पालखी चौक येथे रस्ता रोको करण्यात आला.

याप्रसंगी सोमनाथ भोसले, विकासदादा धाईंजे, वैभव गिते, बाळासाहेब धाईंजे, दिलीप बनसोडे, काकासाहेब जाधव, मिलिंद सरतापे, गोपाळ घार्गे , कुमार लोंढे, विजय बनसोडे, प्रदिप सरवदे, अजित साठे, स्वप्नील सरवदे, रणजित साठे, प्रमिला मोरे, स्मीता साठे, यांनी मनोगतातून निषेध व्यक्त करुन निवेदनातील आमच्या भावना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पर्यंत पोहोचवाव्यात अशी मागणी केली.

यावेळी सुमाबाई बनसोडे,अलका बनसोडे,उषा बनसोडे,रोहीणी धाईंजे, मिनाक्षी साठे,पंचशिला सरवदे,वंदना साठे,कमल थोरात,लाडाबाई खिलारे,रेहना मुलाणी,या महिलांच्या हस्ते वेळापुर पोलीस उपनिरीक्षक अल्ताफ काझी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी किरणतात्या धाईंजे, रजनीश बनसोडे, दादाराजे घाडगे, संदीप माने देशमुख, जावेद मुलाणी, महादेव केंगार, विनायक भगत, कादर शेख व सर्व बहुजन समाजातील विविध संघटनेचे पदाधिकारी कार्यकर्ते समाज बांधव महिला भगीनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.



## साधना कुटी भंडारकवठे येथे साने गुरुजी स्मृतिदिन

सुराज्य/सोलापूर

करी मनोरंजन जो मुलांचे जडेल नाते प्रभू सी तयाचे या सद विचाराने आयुष्यभर कार्य केलेले मुले म्हणजे फुले म्हणत निरंतर बालमनावर सुसंस्कार रुजवण्यासाठी सातत्याने धडपडणारे साने गुरुजींचे स्मृती दिनानिमित्त साधना कुठे सत्संग मंडळ भंडारकवठे संचलित अध्यात्म साधना केंद्रात साने गुरुजी स्मृतीस अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वरणा महिला पतसंस्थेचे संस्थापक श्रीशैल रेवप्पा बुगडे यांच्या हस्ते गुरुजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जीवन विकास प्रशाला भंडारकवठेचे माजी प्राचार्य मल्लिनाथ महादेव कोगणे यांच्या अध्यक्षतेखाली हे कार्यक्रम संपन्न झाले याप्रसंगी श्रीमंत कुंभार सुरेश मालगत्ते विजय बिजर्गी आधी मान्यवर उपस्थित होते

## कंदलगाव येथे जुगार अड्ड्यावर मंद्रूप पोलिसांचा छापा

**१८ आरोपीवर जुगाराचा गुन्हा दाखल ; ३ लाख १६ हजार मुद्देमाल जप्त**

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव येथे जुगार अड्ड्यावर मंद्रूप पोलीसांनी छापा टाकून १८ जणांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावेळी सव्वा तीन लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

याबाबत माहिती अशी की, परिविक्षाधीन भा. पो. से. अधिकारी नवामि साटम यांना कंदलगाव येथे मध्यरात्री जुगार खेळत असल्याची बातमी मिळाली. सदरची बातमी मंद्रूप पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी यांना सांगितली. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्ष रवींद्र मांजरे यांनी तात्काळ पोलीस उपनिरीक्षक अमितकुमार करपे, बिट अंमलदार शहानूर मुलानी व स्टाफ यांना तात्काळ कारवाईकरिता रवाना केले. पथकाने तात्काळ कंदलगाव येथे जाऊन जुगार अड्ड्यावर छापा घालून कारवाई केली आहे.

यावेळी रमेश सदाशिव जाधव (वय ५७) तुकाराम भिमराव मद्रे (वय ३९ राहणार दोघेजण कंदलगाव) संजय परसप्पा सबजे (वय ४० रा कंदलगाव) शिवानंद रेवणसिध्द मोकाशी (वय ३४, रा मंद्रूप) हुवण्णा पांडुरंग शेजाळे (वय ३२ रा) कंदलगाव रफीक अल्लाउददीन शेख (वय ३० रा कंदलगाव) चंद्रकांत काशिनाथ मेंडगुदले (वय ५५ रा मंद्रूप ) अल्लाबक्ष बंदेनवाज नदाफ (वय ४६ रा माळकवठा) मेहबुब अल्लाउददीन शेख (वय ४५ रा कंदलगाव) संतोश भालचंद्र लोकरे (वय ५० रा कंदलगाव) परमेश्वर चनाप्पा राउतराव (वय ५३ रा कंदलगाव) सुर्यकांत म्हाळप्पा लोणारी (वय ५८ रा विंचुर) बाळू टोपा जाधव (वय ४६ रा तेरामैल) आकाश उर्फ पंपु दत्ता व्हनमाने (वय २८ वर्षे क्लब मॅनेजर रा कंदलगाव)

अब्दुल शेख (रा कंदलगाव फरार) विठ्ठल पडवळे (जागा मालक रा कंदलगाव) हणमंत अर्जुन सलगरे (क्लबमालक रा कंदलगाव) सोमनाथ भिमराव जोकारे (क्लबमालक रा कंदलगाव) असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. हे सर्वजण गोलाकार बसून, पत्त्यावर पैसे लावुन मन्ना नावाचा जुगार खेळत व खेळत असताना, रोख रक्कम ९२ हजार २८० रुपये व जुगाराचे साहित्य तसेच जुगार खेळण्याकरीता जाणेयेणेसाठी वापरलेले आठ मोटारसायकल व नऊ मोबाईल असे एकूण ३ लाख १६ हजार २८० रुपयांचा मुद्देमाला जप्त करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस उपनिरीक्षकअमितकुमार करपे हे करीत आहेत.

## इंडियन मॉडेल ज्युनिअर कॉलेजचे जेईई मेन्स व सीईटी परीक्षेत यश

सुराज्य/अक्कलकोट

इंडियन मॉडेल ज्युनिअर कॉलेजमधून एम ,एच, टी ,सीईटी २०२३ मध्ये दिव्या म्हेत्रे ९९.२६ टक्के गुण मिळवले व जेईई मेन्स मध्ये ९८.५७ टक्के मिळवून कनिष्ठ महाविद्यालयात सर्वप्रथम आली. शिवाय





कॉलेजमधून एम,एच,टी, सीईटी २०२३ परीक्षेस एकूण ३५ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते. एकूण प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ऋतुजा गायकवाड ९५.७६ टक्के मिळवून व्दितीय क्रमांक, समर्थ पाटील ९३.०७ टक्के मिळवत तृतीय क्रमांक प्रगती शिंदे ८९.०९ टक्के, श्रध्दा देवकर ८८.१७ टक्के, संप्रिता खुने ८६.१७ टक्के मिळवून यश संपादन केले आहे.या यशस्वी विद्यार्थ्यांना कॉलेजच्या प्राध्यापकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थेचे अध्यक्ष माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी , संचालिका सायली जोशी अम्मा फाऊंडेशनच्या सचिव शीतलताई म्हेत्रे, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणपती वाघमोडे , गौरी दातार यांनी अभिनंदन केले.

## आनंदाचा गंध पसरवायला येणार कस्तुरी

सुराज्य/सोलापूर

हॅपी डिजिटल निर्मित कस्तुरी २६ जून पासून सोम ते शनि रात्री १०.३० वा. कलर्स मराठीवर असणार आहे. एकता लब्दे कस्तुरीची भूमिका साकारणार असून समर कुबेरची भूमिका अशोक फळदेसाई तर निलेशची भूमिका दुष्यंत वाघ साकारणार आहे.अनिकेत जोशी म्हणाले की,यावर्षी कलर्स मराठी वेगवेगळ्या विषयांवर आधारित मालिका प्रेक्षकांच्या भेटीस आणणार आहे.

## 'तुजं माजं सपान' नवी मालिका भेटीला

सुराज्य/सोलापूर

'तुजं माजं सपान' ही दैनंदिन मालिका सोनी मराठी वाहिणीच्या प्रेक्षकांसाठी भेटीला येत आहे.त्याची झलक प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस पडते आहे.नुकताच मालिकेचा प्रोमो प्रेक्षकांच्या भेटीला आला.त्यामध्ये दोघेही आपल्याला कुस्ती करताना दिसताहेत.प्राजक्ता आणि वीरू यांच्या प्रेमाची निराळी गोष्ट प्रेक्षकांच्या भेटीला येते आहे.मालिकेत प्राजक्ता आणि वीरेंद्र यांच्या प्रेमाचे तुफान कसे येणार,हे पाहायला मिळेल.मालिकेची मूळ कहाणी ही कोल्हापूरची आहे. वीरू आणि प्राजक्ता यांच्या या अनोख्या कहाणीची सुरुवात कशा प्रकारे होते आहे, हे आपल्याला १९ जूनपासून पाहता येणार आहे,आपल्या आवडत्या सोनी मराठी वाहिनीवर. नवी मालिका-'तुजं माजं सपान'.१९ जूनपासून, सोम. ते शनि.,संध्या. ७ वाजता,सोनी मराठी वाहिनीवर.

## बार्शीतील महेदिया चषकाचा परांड्याचा एमजीसीए संघ मानकरी

सुराज्य/बार्शी

**परांड्याच्या एमजीसीए संघाने औसाच्या हन्नुरे डोअर्स या संघावर ७ विकेटने मात करत महेदिया चषक पटकावला. विजेत्या संघास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देवून गौरविण्यात आले.**

---

हजरत मिरा सय्यद मुहम्मद जौनपूरी महदी-ए-माऊद अलैहिसलाम यांच्या ५३४ वी बहरेआम व ऊरूस निमित्त महेदीया सामाजिक क्रिडा व सांस्कृतिक मंडळ यांच्यावतीने भव्य टेनिस बॉल डे-नाईट क्रिकेट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेचे उदघाटन महेदिया मशिदीचे इमाम हाजी शहेजादे मौलवी यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाला हाजी इब्नुस महेदवी, पालिका माजी गटनेते दिपक राऊत, बड्डु लांडगे, अब्दुल रज्जाक बाबुडे, अजीज मौलवी, नाना गाढवे, हाजी सलीम पठाण, रमजान तुटके यांची उपस्थिती होती. स्पर्धेदरम्यान माजी नगराध्यक्ष आसिफ तांबोळी , माजी बांधकाम सभापती कयुम पटेल, वकील संघाचे अध्यक्ष ॲड अविनाश जाधव, परांडा शहराचे माजी उपनगराध्यक्ष मतीन जिनेरी यांनी भेट दिली.

या स्पर्धेत बार्शी, पुणे, मैंदर्गी, परांडा, औसा, गोकाक(कर्नाटक), वाघोली येथील १६ संघाने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत अंतिम अटीतटीच्या सामन्यात एमजीसीए परांडा संघाने - औसाच्या हन्नुरे डोअर्स या संघावर ७ विकेटने मात केली. या संघाला रोख १५ हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली. हन्नुरे डोअर्स औसा या संघाला उपविजेता १० हजार रुपये व ट्रॉफी देण्यात आली. तिसरा क्रमांक मैंदर्गी इलेव्हन या संघाने पटकावले व ५ हजार रुपये ट्रॉफी देण्यात आली. या स्पर्धेत मॅन ऑफ द सिरीज रुपये १ हजार रोख व ट्रॉफी परांडा संघाचा खेळाडू इम्रान पिरजादे याला देण्यात आले. बार्शी संघातील शाहबुद्दीन मोमीन यास बेस्ट बॅटसमन व औसा संघातील शकिल मनियारी यास बेस्ट बॉलर ट्रॉफी देवून गौरविण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महेदिया यंग सर्कलचे शाकिर जलसे, अख्तर हन्नुरे, ॲड एम ए लांडगे, एजाज बासडे, मैनु मोमीन, महंमद मोमीन, रफिक हन्नुरे, शकिल बाबुडे, रफिक उस्ताद, बबलू मोरवे, खाँजा लांडगे, आकिल चाबरू, सादिक निंबर्गी, अजिज मोमीन, सद्दाम शेख, शादाब बासडे, जावेद जलसे, सद्दाम मुल्ला, अक्रम बाबुडे, समीर लाडंगे, समीर बासडे, अकिल हन्नुरे, अजिज बाबुडे, शाहबाज उस्ताद, अब्दुल मोमीन, अशरफ बाबुडे, इंजमाम चाबूरू, अमर मोमीन, आसिफ मोमीन यांनी प्रिरिश्रम घेतले.

# बिपरजॉय वादळाचे रौद्ररुप, मुसळधार पाऊस

## कच्छमध्ये भूकंपाचे धक्के

## गुजरातमध्ये ५० हजार जणांचे स्थलांतर



सुराज्य/गुजरात

**गुजरातमधील कच्छ आणि सौराष्ट्राला चक्रीवादळाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे.**

अरबी समुद्रात निर्माण झालेलं बिपरजॉय चक्रीवादळ गुजरातच्या दिशेनं उत्तर-पश्चिम मार्गानं पुढे सरकत असल्याचं दिसून येत आहे. त्यामुळं गुजरातमधील कच्छ आणि सौराष्ट्राला चक्रीवादळाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. चक्रीवादळामुळं येणाऱ्या मुसळधार पावसानं सखल भागात पाणी साचण्याची, पूर येण्याची आणि किनाऱ्यालगत भरतीमुळं उंच लाटा निर्माण होण्याची शक्यता आहे. बिपरजॉय चक्रीवादळ गुरुवारी संध्याकाळी गुजरातच्या किनाऱ्यावर धडकणार आहे. सुरक्षेच्या कारणामुळे आतापर्यंत ५० हजार लोकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे. भुज आणि कच्छमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. भूकंपाची तिव्रता ३.३ रिश्टर स्केल इतकी होती. भूकंपाच्या सौम्य धक्क्यानंतर स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले होते. सौराष्ट्र-कच्छ भागात सोसाट्याच्या वारा सुटलाय, त्यामध्ये भूकंपाचे धक्के जाणवल्यामुळे नागरिकांमध्ये भितीचे वातावरण झाले होते. आतापर्यंत ५० हजार जणांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले.

बिपरजॉय चक्रीवादळ गुजरातमधील जखाऊ पोर्टजवळून जाण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास ताशी १२५ ते १३५ किलोमीटर वाऱ्याच्या वेगासह जमिनीवर धडकणार असल्याची माहिती आहे. त्यामुळं कच्ची घरं आणि बांधकामं कोसळू शकतात, झाडं पडू शकतात आणि वीजपुरवठ्यावरही परिणाम होण्याची चिन्हं आहेत. मुसळधार पावसाचा रस्ते, दळणवळण आणि कनेक्टिव्हिटीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. बिपरजॉय चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर एनडीआरएफ आणि लष्कराच्या टीम तैनात करण्यात आल्या आहेत. गुजरातमधील कच्छ आणि सौराष्ट्र या भागांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात आलं आहे.

बिपरजॉय चक्रीवादळ गुरुवारी संध्याकाळपर्यंत गुजरातमधील सौराष्ट्र आणि कच्छमध्ये धडकणार आहे. अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिलीय. तर गेल्या सहा तासांपासून चक्रीवादळाचा वेग मंदावला आहे. आज आणि उद्या सौराष्ट्र, कच्छमध्ये मुसळधार पावसाचा इशाराही देण्यात आलाय. बिपरजॉय चक्रीवादळाचा लँडफॉल जरी गुजरातमध्ये होणार असला, तरी त्याचे परिणाम मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातही जाणवतायेत.

पुढील दोन दिवस मुंबई, ठाणे, पालघर, नाशिक आणि नंदुरबारमध्ये तुफान वेगानं वारे वाहणार आहेत, तसंच पावसाची देखील शक्यता आहे. दरम्यान, महाराष्ट्रात मान्सून दाखल झाल्यानंतर अजूनही तो सिंधुदुर्ग जिल्ह्यातच आहे. हवामानात अनुकूल बदल होत असला तरीदेखील मान्सून पुढे सरकलेला नाही. पुढील दोन दिवसांत मान्सून पुढे सरकण्याची शक्यता असून, तो १८ जूनच्या आसपास मुंबईत दाखल होईल.

## दोन सराफांना करचुकवेगिरी भोवली

सुराज्य/मुंबई

प्राप्तिकर विवरणपत्र मुदतीत भरले नसल्याची कृती ही आर्थिक गुन्हा आहे आणि अशी कर चुकवेगिरी आरोपींनी यापूर्वीही केली आहे', असे नमूद करत बॅलार्ड पियर येथील अतिरिक्त मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी न्यायालयाने झवेरी बाजारमधील दोन सराफांना अलीकडेच सहा महिन्यांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. दरम्यान या शिक्षेविरोधात अपिल करता यावे याकरिता न्यायालयाने त्यांना नंतर तात्पुरता जामीनही मंजूर केला.

सलोनी ज्वेलर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मेसर्स यलो ज्वेलर्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांचे संचालक जितेंद्र जैन व किरण जैन यांच्याविरोधात प्राप्तिकर विभागाने गुन्हा नोंदवून २०१८मध्ये खटला भरला होता. २०१४-१५ या करनिर्धारण वर्षात आरोपींना १० कोटी ७५ लाख ३८ हजार ४८२ रुपये नफा झाला होता आणि कर वजावटीनंतर सहा कोटी ८३ लाख ४१ हजार २६५ रुपयांचा नफा होता. दोन्ही कंपन्यांची प्राप्तिकराची जबाबदारी सुमारे साडेचार कोटी रुपयांची होती. करपात्र उत्पन्न असूनही आणि करपात्र उत्पन्न असल्यास मुदतीत प्राप्तिकर भरणे कंपन्यांना बंधनकारक असूनही या संचालकांनी ते टाळले. शिवाय यापूर्वीही त्यांनी असे केले होते', अशा आरोपाखाली प्राप्तिकर विभागाने त्यांच्याविरोधात प्राप्तिकर कायद्याच्या कलम २७६-सीसी व २७८-ई या कलमांखाली गुन्हा नोंदवला होता.

संबंधित आर्थिक वर्षात आम्हाला नुकसान झाले होते', असा बचाव करण्याचा प्रयत्न आरोपींनी केला. मात्र, न्यायालयाने तो फेटाळून लावला. प्राप्तिकर विवरणपत्र न भरणे चुकून व अनवधानाने झाल्याचे आरोपींना सिद्ध करता आलेले नाही. शिवाय त्यांनी २०१६ या वर्षाच्या मध्यात सुमारे १२ कोटी रुपये बँकेत जमा केल्याचे प्राप्तिकर विभागाने दाखवले आहे.

## विविध प्रकल्प लाखोंचा चुराडा

सुराज्य/पिंपरी



पिंपरी-चिंचवड महापालिकेने विविध प्रकल्प वेगाने राबविण्यासाठी विविध सल्लागार नेमले आहेत. त्यांच्या मानधनासाठी महापालिका दर महिन्याला २८ लाख रुपये खर्च करीत आहे. मात्र, खर्च करूनही बहुतांश प्रकल्प मुदतीमध्ये पूर्ण झालेले नाहीत, परिणामी, प्रशासनावर त्यांना मुदतवाढ देण्याची नामुष्की ओढविली आहे.

महापालिकेच्या मोठ्या व महत्त्वपूर्ण प्रकल्पांना गती मिळावी, म्हणून तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सिटी टान्फॉर्मेशन ऑफिस' (सीटीओ-शहर परिवर्तन कार्यालय) ही नवी संकल्पना सुरू केली. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सल्लागारांचा सल्ला घेऊन कामे मुदतीमध्ये पूर्ण करण्यासाठी सीटीओ'ची निर्मिती झाली. त्यासाठी पॅलेडियम' या एजन्सीची दोन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली. ही एजन्सी जानेवारी २०१८पासून महापालिकेत काम करीत आहे. महापालिकेकडून एजन्सीच्या नऊ कर्मचाऱ्यांना दरमहा २२ लाख बिल देण्यात आले. दोन वर्षांची मुदत २०१९ला संपल्याने एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर दोन वर्षांसाठी निविदा काढण्यात आली. यामध्ये हीच एजन्सी पात्र ठरली आहे. मात्र, ही मुदत संपल्यानंतरसुद्धा पुन्हा एक वर्ष मुदतवाढ देण्यात आली आहे. सध्या १० कर्मचारी काम करीत आहेत.

महापालिकेच्या कामांचे सादरीकरण करणे, डाटा गोळा करणे, राज्य व केंद्राशी इंग्रजीत पत्रव्यवहार करणे आदी कामे सीटीओ' करीत आहे,' असे अधिकाऱ्यांनी सांगितले. हे अधिकारी आयुक्तांच्या सूचनानुसार महापालिकेत काम करतात.



## मुख्यमंत्र्यांची दुआ मुलीचे नावही दुआ ठेवले

सुराज्य/कोल्हापूर

आज कोल्हापुरातील शासन आपल्या दारी या कार्यक्रमात जिथे सर्वत्र शिट्ट्या आणि घोषणा सुरू होत्या यावेळी एक क्षण असा आला जिथे प्रत्येकाला त्या क्षणाचे कौतुक आणि भावना दाटून आल्या. व्यासपीठावरील सूत्रसंचालकांनी एका लहान मुलीची गोष्ट सांगितली आणि मुख्यमंत्र्यांनी देखील लहान मुलीला हातात घेतले. मुख्यमंत्री काही क्षण तिच्याकडे पाहत होते. ती मुलगी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमुळे वाचली होती. त्यावेळी ती अवघी २६ दिवसांची होती.

झाले असे की, कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील एक मुस्लिम नवदांपत्य आपल्या चिमुकली सोबत मुख्यमंत्री महोदयांची भेट घेण्यासाठी दुपारी कार्यक्रमाच्या ठिकाणी आले आणि मुख्यमंत्री महोदयांची भेट घेण्याचा आग्रह करू लागले. मात्र मुख्यमंत्री असल्याने बंदोबस्त मोठा होता. शिवाय प्रत्येकाला भेटण्यासाठी ओळखपत्र देण्यात आले होते. यामुळे बंदोबस्तास असलेल्या पोलिसांनी नवदांपत्याचे तात्काळ उपस्थित स्वयंसेवकांची भेट घालून दिली.

आपल्या मुलीचे प्राण वाचले असून, आम्हाला कृतज्ञता म्हणून मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानायचे आहेत असे सांगितले.

## कोव्हिडनंतरच्या दुसऱ्या वर्षातही ५० हजारांपेक्षा जास्त रक्तदान

सुराज्य/संभाजीनगर

तब्बल १० ते १२ जिल्ह्यांमधून शहरात येणाऱ्या काही लाख रुग्णांवरील अनेकविध प्रकारचे उपचार, प्रक्रिया तसेच शस्त्रक्रिया या रक्तदात्यांच्या भक्कम बळावर होत आहेत आणि कोव्हिडनंतरच्या दुसऱ्या वर्षांतही सुमारे ५० ते ६० हजार रक्तदात्यांमुळे लाखापेक्षा जास्त रुग्णांना प्रत्यक्ष जीवन आधार मिळाल्याचेही बुधवारी (१४ जून) पाळण्यात येत असलेल्या जागतिक रक्तदाता दिनानिमित्त स्पष्ट झाले आहे. पुन्हा दात्यांचे प्रमाण दरवर्षी सुमारे ५ ते ६ टक्क्यांनी वाढत असले तरी रक्त व रक्तघटकांची गरजही तितकीच वाढत आहे. त्यामुळे रक्तदानासाठी म्हणजेच जीवनदानासाठी पुढे यावे, असे आव्हाहनही या निमित्ताने तज्ज्ञांनी केले आहे.



केवळ शहराचा विचार केला तरी छत्रपती संभाजीनगरमध्ये आजघडीला ३० पेक्षा जास्त मोठी व मध्यम रुग्णालये आहेत, ज्या ठिकाणी रोजच वेगवेगळ्या प्रकारच्या नियोजित शस्त्रक्रिया व उपचार प्रक्रिया होत आहेत. त्याशिवाय तातडीच्या शस्त्रक्रिया व उपचार प्रक्रिया होण्याचे प्रमाणही लक्षणीय आहे. या सर्व उपचार व शस्त्रक्रियांमध्ये रक्त व रक्तघटक अनिवार्य असतात. तसेच ५०० पेक्षा जास्त थॅलेसेमिया व इतर रक्तविकार असणाऱ्या व्यक्तींनाही प्रत्येक महिन्याला रक्ताची गरज असतेच. महत्वाचे म्हणजे अजूनही संपूर्ण मराठवाडा विभागासह बुलडाणा, नगर, अकोला आदी जिल्ह्यांचे कितीतरी रुग्ण रोजच छत्रपती संभाजीनगरमध्ये उपचारांसाठी येतात.

## राष्ट्रवादीचे तीन नेते 'बीआरएस'च्या संपर्कात

सुराज्य/अहमदनगर

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये वरिष्ठ पातळीवर भाकरी फिरविली असली तरी खालच्या पातळीवर अनेक ठिकाणी विविध कारणांमुळे नाराजी असल्याचे दिसून येत आहे. अहमदनगर जिल्ह्यातील पक्षाचे तीन नेते राज्यात नव्याने हातपाय पसरत असलेल्या भारत राष्ट्र समिती (बीआरएस) या पक्षाच्या संपर्कात असल्याची माहिती मिळत आहे.

यापैकी श्रीगोंदा तालुक्यातील महत्वाचे नेते मानले जाणारे घन:श्याम शेलार सध्या हैद्राबादमध्ये गेले असून तेथे ते बीआरएसचे नेत तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात आले. तर कर्जत आणि पाथर्डी तालुक्यातील आणखी दोघेही बीआरएसच्या संपर्कात आहेत. ते दोघेही ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे विश्वासू असल्याचे सांगण्यात येते.

तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी आपल्या पक्षाचा महाराष्ट्रात विस्तार करण्यास सुरुवात केली आहे. मराठवाड्यात सभा झाल्यानंतर नगर जिल्ह्यातही त्यांना प्रतिसाद मिळत आहे. नेमकी विधानसभेची तयारी सुरू असताना बीआरएसने महाराष्ट्रात लक्ष घातले आहे. त्यामुळे पुढील सोय लक्षात घेता विविध पक्षांतील नेत्यांकडून प्रतिसाद मिळेल, अशी अटकळ राव यांची असावी. ती खरी ठरताना दिसत आहे. नगर जिल्ह्यात याची सुरवात राष्ट्रवादी काँग्रेसपासून होत असल्याचे दिसते.

घन:श्याम शेलार यांची राजकीय सुरुवात भाजपपासून झाली. त्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आले. ते पक्षाचे जिल्हाध्यक्ष होते. मात्र, पुन्हा पाक्षपासून दुरावले. नंतर पुन्हा पक्षात आल्यावर विधानसभेची उमेदवारीही मिळाली. आता पुढील विधानसभेला ते इच्छुक असल्याचे मानले जात असतानाच श्रीगोंदा मतदारसंघातून पक्षाने माजी आमदार राहुल जगताप यांना ताकद देण्यास सुरुवात केली आहे. जगताप यांनीही अलीकडे झालेल्या छोट्या मोठ्या निवडणुकांत आपला करिष्मा पुन्हा दाखवून दिला आहे. त्यामुळे आता पक्षाकडून त्यांनाच उमेदवारी दिली जाण्याची चिन्हे दिसू लागल्याने शेलार अस्वस्थ आहेत.

## डॉ.रामोड यांच्याकडून मोठे घबाड हाती लागले

सुराज्य/पुणे



**पुण्याचे अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ. अनिल रामोड यांच्यासह त्यांचे कुटुंबीय आणि नातेवाइकांच्या नावाने असलेल्या एकूण १७ बँक खात्यांमध्ये ४७ लाख रुपयांपेक्षा अधिक रक्कम असल्याचे केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) तपासात समोर आले आहे. मात्र, हे पैसे कोणत्या माध्यमातून जमवले आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. दरम्यान, रामोड यांना मंगळवारी (१३ जून) १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.**

सोलापूर जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादन प्रकरणात जमीनधारकाला जादा मोबदल्या देण्यासाठी रामोड यांनी आठ लाख रुपयांची लाच स्वीकारली. सीबीआयने सापळा लावून रामोड यांना रंगेहाथ पकडले. त्यानंतर त्यांचे निवासस्थान आणि कार्यालयातून सहा कोटी ६४ लाख रुपयांची रोकड जप्त करण्यात आली.

या प्रकरणी दाखल गुन्ह्यात सीबीआय न्यायालयाने रामोड यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. मंगळवारी कोठडी संपल्याने रामोड यांना न्यायालयात आणण्यात आले होते.

'आरोपीला जामीनावर सोडल्यास पुराव्यांमध्ये छेडछाड करण्याबरोबरच कर्मचारी व साक्षीदारांवर प्रभाव टाकण्याचा प्रकार घडू शकतो; तसेच त्यांचे कार्यालय व इतर ठिकाणाहून पुरावे जमा करायचे असल्याने आरोपीला न्यायालयीन कोठडी द्यावी,' अशी विनंती तपास अधिकाऱ्यांनी सीबीआय न्यायालयाकडे केली.

ती विनंती मान्य करीत सीबीआयचे विशेष न्यायाधीश ए. एस. वाघमारे यांनी रामोड यांना २७ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. त्यामुळे रामोड यांची रवानगी येरवडा कारागृहात करण्यात आली आहे.

दरम्यान, रामोड याच्या जामिनासाठी अर्ज केला जाणार असल्याचे त्यांच्या वकिलांनी सांगितले. तपासादरम्यान रामोड यांच्या आवाजाचे नमुने घेण्यात आले आहेत.

'सीबीआयने रामोड यांना अटक केल्यानंतर त्यांची सखोल चौकशी करण्यात येत असून, सुरुवातीपासूनच रामोड चौकशीत सहकार्य करीत नाहीत, उडवाउडवीची उत्तरे देत आहेत,' अशी माहिती सीबीआयच्या विशेष सरकारी वकिलांनी न्यायालयाला दिली.

## जेपी नड्डा लोकसभा तयारीसाठी येणार नाशिक दौऱ्यावर

सुराज्य/नाशिक



भाजप आणि शिवसेना शिंदे गटात कल्याण आणि ठाणे लोकसभेच्या जागेवरून वाद सुरू असतानाच, भाजपने आता आपला मोर्चा शिवसेना शिंदे गटाचे खासदार असलेल्या नाशिक लोकसभेकडे वळवला आहे. भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस कैलास विजयवर्गीय यांच्या दौऱ्यानंतर सिंहस्थ भूमीत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा स्वत:च येणारअसून, येत्या २६ जून त्यांच्या उपस्थितीत पक्षाची जाहीर सभा होणार आहे. याबरोबरच ते श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वरचाही दौरा करणार असून, शहरातील सामाजिक, क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींच्या गाठीभेटी घेणार आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे शिंदे-फडणवीस सरकार वाचले असले तरी, १६ आमदारांच्या अपात्रतेबाबत भाजप साशंक असून, त्यानिमित्त शिंदेसेनेला दबावात आणण्याचे राजकारण भाजपकडून सुरू आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विधानसभा निवडणुका लोकसभा निवडणुकांसोबत घेण्याची तयारी सुरू केली आहे. त्याचाच भाग म्हणून भाजपने मिशन २०२४ सुरू करीत, राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघ आणि २८८ विधानसभा मतदारसंघामध्ये आपली ताकद मजबूत करण्याचे काम सुरू केले आहे. भाजपने शिंदे सेनेच्या १३ खासदारांच्या मतदारसंघामध्येही संयोजक आणि लोकसभा प्रमुखांची नियुक्ती करून या मतदारसंघावर आपला दावा करण्यास सुरुवात केल्याने शिंदेसेना आणि भाजपमध्ये मिठाचा खडा पडला आहे.

## महत्त्वाचे वृत्त

### पालघरमध्ये २९ वर्षीय विवाहितेवर बलात्कार



पालघर : पालघरमधल्या नालासोपारा या ठिकाणी घर दाखवण्याच्या बहाण्याने घरी घेऊन जात एका महिलेवर बलात्कार करणाऱ्या इसमाला पोलिसांनी अटक केली आहे. आकाश विठ्ठल सकपाळ असं बलात्कार करणाऱ्या इसमाचं नाव आहे. पोलिसांनी त्याला अटक केली आहे. आकाश सकपाळ आणि पीडित महिला हे नालासोपारा या ठिकाणी शेजारी राहतात. तीन वर्षांपासून एकमेकांना ओळखतात. महिलेचं लग्न झालेलं असून ती तिच्या पतीसह आरोपीच्या घराशेजारी राहते.

### मद्यपी पित्याची मुलाने केली हत्या

मुंबई : दारू पिऊन दररोज आईसोबत वाद घालणाऱ्या ६० वर्षीय पित्याची मुलाने चाकूने हल्ला करून हत्या केल्याचा प्रकार चेंबूर आरसीएफ परिसरात मंगळवारी रात्री घडली. हत्येनंतर मुलगा स्वतः पोलीस ठाण्यात हजर झाला. मुलाविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला अटक करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. चेंबूर येथील आरसीएफ परिसरात श्रीनिवास गौडा (६०) पत्नी सुमित्रादेवी आणि मुलगा सुनील (४२) यांच्यासोबत राहत होते. श्रीनिवास यांना मद्याचे व्यसन होते. मद्यधुंद अवस्थेत ते वारंवार पत्नीसोबत भांडण करीत होते. या प्रकारामुळे संतापलेल्या सुनीलने मंगळवारी रात्री वडिलांवर चाकुने हल्ला करुन हत्या केली.

### भाजपमुक्त महाराष्ट्र करण्याचा काँग्रेसचा निर्धार

मुंबई : राज्यात महाविकास आघाडी मजबूत करण्याबरोबरच आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपमुक्त महाराष्ट्र करण्याचा निर्धार काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीत करण्यात आला. बैठकीत लोकसभा मतदारसंघनिहाय राजकीय परिस्थितीचा आढावा घेऊन निवडणूक रणनीतीवरही चर्चा करण्यात आल्याची माहिती राज्याचे प्रभारी एच.के. पाटील यांनी दिली. राज्यात पक्षसंघटना बळकट करुन जास्तीत जास्त कशा जिंकता येतील, यावरही चर्चा करण्यात आली. आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपमुक्त महाराष्ट्र करण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आल्याचे पाटील यांनी सांगितले.

### १५ हजाराचा बूट कुत्र्याने पळविला

संभाजीनगर : नेता म्हटलं तर आपल्या डोळ्यासमोर उभे राहते ती आलिशान गाडी, आलिशान घर, महागडे मोबाईल कपडे चप्पल आणि बुट. मात्र सर्वसामान्यांची महागडी वस्तू चोरीला गेली की जेवढी चर्चा होत नाही, त्यापेक्षा चर्चा होते ती नेत्यांच्या साहित्य चोरी झाल्याची. छत्रपती संभाजीनगर शहरांमध्ये अशीच एक घटना घडली आहे. माजी महापौर नंदकुमार घोडेले यांचा तब्बल पंधरा हजारांचा बूट मोकाट श्वानांनी पळवून नेला आहे. दरम्यान ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे.

### जे.जे.च्या संपकरी डॉक्टरांवर कारवाई करा

मुंबई : वरिष्ठ डॉक्टरांकडून छळ व दडपशाही केली जात असल्याचा आरोप करून संपावर जाणाऱ्या जे. जे. रुग्णालयातील निवासी डॉक्टरांवर कारवाईचे आदेश द्यावेत, या मागणीसाठी उच्च न्यायालयात जनहित याचिका करण्यात आली आहे. मोतीबिंदूमुक्त महाराष्ट्राचे समन्वयक डॉ. तात्याराव लहाने आणि नेत्रशल्य विभागाच्या प्रमुख प्राध्यापिका डॉ. रागिणी पारेख यांचे राजीनामे राज्य सरकारने मंजूर केल्यानंतर महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्सने (मार्ड) रविवारी संप मागे घेतला होता. निवासी डॉक्टरांच्या तक्रारींच्या निवारणासाठी समिती कार्यरत आहे. मात्र, तक्रारींसाठी कायदेशीर मार्गाचा अवलंब न करता जवळपास ७५० निवासी डॉक्टर वरिष्ठ डॉक्टरांच्या विरोधात संपावर गेले.

### कारचा वेग नडला,झाडाला धडकल्याने चक्काचूर

बीड : अंबाजोगाई तालुक्यातील सनई-आडस मार्गावर दोन डॉक्टर आपल्या कारमधून कामानिमित्त जात होते. मात्र अचानक चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि त्यांची कार ही रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर जाऊन आदळली. या अपघातात डॉक्टर प्रमोद बुरांडे आणि सहकारी डॉक्टर रवी सातपुते या दोघांनाही गंभीर जखम झाली होती. अपघात झाल्याचं कळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी दाखल होत जखमी दोघांना रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील डॉक्टरांनी तपासून प्रमोद बुरांडे यांना मृत घोषित केले, तर रवी सातपुते यांनीही उपचारादरम्यान प्राण सोडले.

### एकतर्फी प्रेमातून मुलीस जाळण्याचा प्रयत्न

चंद्रपूर : बेलगाव येथील एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीने प्रेमास नकार दिल्याने युवकाने तिच्या घरी जाऊन अंगावर पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना भद्रावती येथे घडली. हा प्रकार कुटुंबियांच्या लक्षात येताच मुलीला लगेच बाजूला केल्याने मोठा अनर्थ टळला. पोलिसांनी मंगळवारी आरोपीला अटक केली. सिध्दांत भेले (२८, रा. बेलगाव) असे आरोपीचे नाव आहे. न्यायालयाने त्याला १५ जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. आरोपी सिध्दांत भेले आणि पीडित मुलीची ओळख होती.

### चक्रीवादळ आज जाखू बंदरात धडकणार

पुणे : अरबी समुद्रातील अतितीव्र बिपरजॉय चक्रीवादळ उत्तरेला पुढे सरकत आहे. हे चक्रीवादळ गुरुवारी (१५ जून) सायंकाळी गुजरातमधील जाखू बंदर परिसरात धडकू शकते. किनारपट्टीवर धडकताना वाऱ्याचा वेग सुमारे १५० किलोमीटर प्रती तास इतका राहण्याची शक्यता असल्याने किनारपट्टी परिसरात नुकसान होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला. हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी दिलेल्या माहितीनुसार, अति तीव्र चक्रीवादळाचा वेग कमी झाल्यामुळे त्याचे तीव्र चक्रीवादळात रूपांतर झाले आहे. किनारपट्टीवर धडकताना वाऱ्याचा वेग प्रती तास १५० किलोमीटरवर जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे जाखू बंदर, पोरबंदर, द्वारका, सौराष्ट्र, कच्छ, मांडवी परिसरात नुकसान होण्याची शक्यता आहे.

### पाच रुपयासाठी चोरट्याने एटीएम फोडले

चंद्रपूर : चोरटे आर्थिक लाभाच्या आमिषापोटी चोऱ्या करतात. दागिने अथवा रोख रक्कम चोरट्यांकडून चोरली जाते. मात्र, चंद्रपुरात एका चोराने केवळ पाच रुपयांसाठी वॉटर एटीएम फोडल्याचा धक्कादायक प्रकार जिल्हातील सिंदेवाही तालुक्यातील वासेरा गावात घडला. वॉटर एटीएमच्या चोरीमुळे गावात शुद्ध पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. सिंदेवाही तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालय वासेरा अंतर्गत चार महिन्यांपूर्वी थंड आणि शुद्ध पिण्याच्या पाण्यासाठी वॉटर एटीएम सुरू कण्यात आले होते. या एटीएम मधून गावकऱ्यांना थंड आणि शुद्ध पिण्याचे पाणी मिळत होते. एटीएममध्ये पाच रुपयांचे नाणे टाकून नागरिकांना पंधरा लीटर पाणी विकत घेता येत होते. या एटीएमवर भुरट्या चोरांची नजर पडली. चोरांनी पाच रुपयासाठी वॉटर एटीएम मशीन फोडली अन पाच रुपये पळविले. पाच रुपयांसाठी एटीएम फोडणाऱ्या या चोराचा शोध पोलीस घेत आहेत.

# रस्ते बंद चिमणी पाडकाम सुरु

- सर्वत्र कडक पोलिस बंदोबस्त; १८ जूनपर्यंत संचारबंदी लागू
- नागरिकांची पोलिसांकडून चौकशी

सुराज्य/सोलापूर

**सिद्धेश्वर कारखान्याची बेकायदेशिर चिमणी पाडण्यासाठी महापालिका आणि पोलिस प्रशासनाने बुध युद्ध पातळीवर प्रयत्न सुरू केल्याचे दिसून आले. कारखान्याच्या दोन किलो मिटरच्या परिसरात १८ जूनपर्यंत संचारबंदी लागू करण्यात आली आहे. पाडकामा दरम्यान कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सर्वत्र बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.**

दरम्यान, बुधवारी प्रशासनातर्फे चिमणी पाडणार की नाही याबाबतीत मात्र संपूर्ण शहरांमध्ये उलट सुलट चर्चा दिवसभर सुरु होत्या. आषाढी वारी पूर्वी का आषाढी वारी नंतर चिमणी पडणार याबद्दल शहरवाशांना साशकता होती. परंतु मध्य रात्रीपासूनच पोलीस प्रशासन सतर्क झाल्याने चिमणी पडणार हे जवळपास निश्चित झाले. याबाबत पोलीस प्रशासनाने कमालीची गोपनीयता पाळीली होती.कोणतेही माहिती देण्यास पोलीस प्रशासनाने सहकार्य केले नाही.सोलापूर शहर जिल्ह्यासह मुंबई जालना नवी मुंबई या ठिकाणचा जवळपास दोन ते अडीच हजाराचा पोलीस कर्मचाऱ्यांचा बंदोबस्त या संपूर्ण प्रक्रियेसाठी सज्ज असल्याचे दिसून आले. पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पोलीस उपायुक्त विजय कबाडे, पोलीस उपायुक्त अजय बोऱ्हाडे, पोलीस उपायुक्त दिपाली काळे यांच्यासह विजापूरनाका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळकृष्ण हनपुडे- पाटील वळसंग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल सनगले यांच्यासह कर्मचारी पोलीस कर्मचारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस बंदोबस्त कार्यरत आहे.



## हत्तुरे वस्ती-कुमठा रोडपासून वाहतूक बंद

पहाटे तीन वाजल्यापासून हत्तुरे वस्ती- कुमठा रोड परिसरात पोलिसांनी मोठा बंदोबस्त लावला होता. पोलीस आणि शासकीय वाहने सोडून कोणालाही आत प्रवेश दिला जात नव्हता. कुमठा रोड नंतर कारखाना टोल गेट परिसरातही पोलिसांनी कडक बंदोबस्त लावला आहे. कुमठा रोड येथे बॅरिकेट्स टाकून रस्ता बंद करण्यात आला आहे. जवळपास ६० पोलिस कर्मचारी याठिकाणी तैनात करण्यात आले आहेत. ज्यांना कारखान्याकडे जाणारा रस्ता बंद आहे याची माहिती नव्हती त्यांची मोठी तारांबळ उडाल्याचे दिसून आले. या परिसरातील सर्व शाळा, दुकाने, हॉटेल्स बंद ठेवण्यात आले आहेत.

## ग्रामीण भागातही कडक बंदोबस्त

सुलेर जवळगी, एनटीपीसी उड्डाणपूल, होटगी, साखर कारखाना परिसर, कुंभारी परिसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे. या भागातून कोणालाही कारखाना परिसरात सोडण्यात येत नव्हते. याशिवाय ज्या गावात कारखान्याचे संचालक आहेत त्या गावातही कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. राज्य राखीव दलाच्या तुकाड्यांना पाचारण करण्यात आले आहे.

## आंदोलनकर्त्यांना रात्रीच ताब्यात घेतले

चिमणी पाडकामास विरोध करण्यासाठी कारखाना बचाव कृती समिती व कारखान्याचे संचालक मंडळाने कामगारांसोबत बैठक घेतली होती या बैठकीत चिमणी पाडकामास विरोध म्हणून रास्ता रोको, आत्मदहन, चिमणीवर चढून विरोध करणे,असे आवाहन हीकरण्यात आले होते.त्यांचा विरोध लक्षात घेता कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून आंदोलनकर्त्यांना रात्रीच ताब्यात घेऊन त्यांची नजर कैदेत रवानगी केली. या सर्व प्रक्रियेत पोलिसांनी अतिशय गोपनीयता पाळली हे विशेष होय.






## मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गावात पोलीस तैनात

दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व गावांमध्ये तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांच्या नेतृत्वाखाली कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सोलापूर ग्रामीण दलाच्या वतीने ७ पोलीस अधिकारी , ४७ पोलीस अंमलदार,एक एसआरपी प्लाटून आणि ४० होमगार्डस यांची नेमणूक करण्यात आली आहे.यासाठी तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. दक्षिण सोलापूर सह अन्य तालुक्यांमध्ये १४४ कलम लागू करण्यात आला असून पाच किंवा त्यापेक्षा अधिक व एकत्रित येण्यासाठी मनाई करण्यासाठी आली आहे. जे आदेशाचे पालन त्यांच्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. या सर्व बाबींचा विचार करून नागरिकांनी आदेशाने पालन करावे, आदेश असेही म्हटले आहे.

### चिमणी प्रकरणाला राजकीय वळण : कोठे

सिद्धेश्वर कारखान्यावर साडेचारशे कोटींचे कर्ज आहे. चिमणी पाडल्यानंतर को- जनरेशन बंद होणार आहे. त्यामुळे कारखाना अडचणीत येणार आहे. उद्योगधंदे बंद पडतात म्हणून सोलापूरचे नाव खराब झाले आहे, ती प्रथा आता पुढे सुरू राहिल. चिमणी पाडल्यानंतर विमानसेवा सुरू होणार आहे याची कोणी हमी घेतली नाही. यापूर्वी किंगफिशरची विमानसेवा बंद पडली आहे. त्यामुळे आता या प्रकरणाला राजकारणाचे वळण लागत आहे. इतर कारखाने चांगले चालावे म्हणून हे राजकारण होत असल्याची शंका येत असल्याचे माजी महापौर महेश कोठे म्हणाले.

### बसची बोंब, म्हणे विमानसेवा देणार : प्रा. निंबर्गी

चिमणीवर करण्यात येणारी कारवाई राजकीय हेतूने करण्यात येत आहे. यामुळे कामगार आणि शेतकरी उपाशी राहणार आहे. त्यामुळे ते या मागे असणाऱ्यांना निश्चित धडा शिकवतील. सोलापुरात महापालिकेची परिवहन सेवा सुरू करू न शकणारे आता चिमणी पाडून विमानसेवा सुरू करणार का असा सवाल काँग्रेसचे प्रवक्ते प्रा. अशोक निंबर्गी यांनी केला.

### भाजपला जनता माफ करणार नाही : नरोटे

लाखो लोकांची उपजीविका अवलंबून असणारा, शेतकऱ्यांच्या उसाला चांगला दर देणारा सिद्धेश्वर कारखाना भाजपच्या आमदार, खासदारांच्या राजकीय षडयंत्रात अड़कला आहे. चिमणी पाडकाम सुरू करून शेतकऱ्यांच्या पोटावर पाय देण्याचे काम केले आहे. यासाठी जनता भाजपला माफ करणार नाही,असे म्हणत काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी या कारवाईचा निषेध केला.

### भाजप लोकप्रतिनिधींना फटका बसेल : पाटील

चिमणी पाडण्याची कारवाई चुकीचे आहे. यामुळे शेतकरी आणि कामगारांचे नुकसान झाले आहे. ही कारवाई झाल्यास शहरातील आमदार, खासदार आणि महापालिकेत भाजपच्या उमेदवारांना फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे ही कारवाई करू नये असे माजी नगरसेवक सुरेश पाटील यांनी म्हटले आहे.

### कारखाना बंद पाडण्याचे षडयंत्र : चंदनशिवे

सिद्धेश्वर कारखाना जिल्ह्यातील एकमेव पारदर्शीपणे चालणारा कारखाना आहे. चिमणीच्या नावाखाली कारखाना बंद पाडण्याचे षडयंत्र रचण्यात येत आहे. यापूर्वीही विमान येत जात होते, मात्र आता यात राजकारण होत असल्याचा आरोप माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांनी केला.

### लिंगायत समाज भाजपला धडा शिकवेल : हत्तुरे

कर्नाटकात झालेल्या पराभवामुळे महाराष्ट्रात लिंगायत समाजावर भाजप अन्याय करत आहेत. या सरकारला शेतकरी-कामगारांचे देणेघेणे नाही. चिमणी पाडल्याने शेतकरी-कामगार देशोधडीला लागणार आहे. केवळ काडादी यांना विरोध म्हणून ही कारवाई होत आहे. ही कारवाई सुडबुद्धीने होत आहे. निश्चित लिंगायत समाज भाजपला धडा शिकवेल असे अखिल भारतीय लिंगायत समन्वय समितीचे राज्य समन्वयक विजय हत्तुरे यांनी म्हटले.



## माकपच्या कार्यकर्त्यांना घेतले ताब्यात

विमानाच्या नावाने राजकारण करून सिद्धेश्वर साखर कारखाना बंद पाडून शेतकरी कामगारांना उद्ध्वस्त करू करण्याऱ्या महापालिका प्रशासनाच्या निषेधार्थ माकप अग्रेसर झाल्याचे दिसून आले. चिमणी पाडण्याची भूमिका ही शेतकरी कामगारांच्या विरोधात असून जमावबंदी आदेशाचा भंग करून शेतकरी कामगारांसाठी माकप रस्त्यावर उतरला आहे, अशी भूमिका माकप चे जिल्हा सचिव अँड.एम.एच.शेख यांनी व्यक्त केली. शेतकरी कामगारांच्या समर्थनार्थ व महापालिका प्रशासनाच्या आठमुठी भूमिकेच्या विरोधात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष शेकडो कार्यकर्त्यांना साखर कारखान्या कडे आगेकूच करताना पोलिसांनी माकप चे जिल्हा सचिव ॲड.एम.एच.शेख व युसूफ शेख मेजर यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. आडम मास्तर यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन बैठक पार पडली. त्यानंतर माकप चे जिल्हा सचिव शेख यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार रात्रभर कार्यकर्ते जागरण करून सकाळी पोलिसांना चकवा देत लाल झेंडे घेऊन पालिका व पोलिस प्रशासनाच्या विरोधात जोरदार घोषणा देत मोर्चा काढला.यावेळी पोलिसांची तारांबळ उडाली. रस्त्यावर ठिय्या मांडताच पोलिसांनी बळाचा वापर करून कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. यावेळी व्यंकटेश कोंगारी, ॲड. अनिल वासम, विल्यम ससाणे, बापू साबळे, विक्रम कलबुर्गी, हसन शेख, दाऊद शेख, नरेश दुगाने, मुरलीधर सुंचु, अकील शेख, बाबु कोकणे, विजय हरसुरे, अप्पाशा चांगल शिवा श्रीराम आदींसह शेकडो कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.



## लग्न कार्यासाठी आलेल्या वऱ्हाडी मंडळींचा झाला खोळंबा

बुधवारी काडादी मंगल कार्यालयात माजी नगरसेवक चंद्रकांत रमणशेट्टी यांच्या भावाच्या मुलाचे लग्नकार्य होते. हजार-दोन हजार वऱ्हाडी मंडळींची लग्नासाठी व्यवस्था करण्यात आली होती. मात्र कुमठा रोडपासून रस्ता बंद असल्याने अनेक वऱ्हाडी मंडळींचा मोठा खोळंबा झाल्याचे दिसून आले. या मंगल कार्यालयात देखील , साध्या वेशातील पोलिसांनी लग्नकार्यासाठी येणाऱ्या नागरिकांवरती चोख नजर ठेवली होती. लग्न कार्यासाठी आलेल्या लोकांना देखील मुख्य रस्त्यावरून जाण्यास बंदी करण्यात आली होती. त्यामुळे अनेकजण पोलिसांशी हुज्जत घालताना दिसून आले. शेवटी पोलिसांनी कुमठा रोडवरच्या लहान रस्त्यावरून लग्नकार्यास जाण्यास वऱ्हाडी मंडळींना परवानगी दिली. मात्र गर्दी वाढत असल्याचे दिसल्यावर तोही रस्ता दुचाकी आणि चारचाकीसाठी बंद करण्यात आला. त्यामुळे अनेक वऱ्हाडी मंडळी मिळेल त्या रस्त्याने चालत कारखाना स्थळावर लग्नकार्यासाठी पोहचण्याचा प्रयत्न केला.

### किरण देशमुखांची गाडी गेल्यावर वऱ्हाडी मंडळींना सोडले



राजकीय नेत्याच्या नातलगाचे लग्न असल्याने या लग्नासाठी शहरातील अनेक माजी नगरसेवक हजर होते. सुरूवातील सुरेश पाटील आणि प्रा. अशोक निंबर्गी यांना लग्नाला जाण्यापासून रोखण्यात आले. मात्र आ. विजयकुमार देशमुख यांचे चिरंजीव किरण देशमुख यांना गाडीतून सोडण्यात आल्यानंतर वऱ्हाडी मंडळींसह नेत्यांनाही सोडण्यात आले. लग्नाला माजी महापौर महेश कोठे, किरण देशमुख, चेतन नराटे, सुरेश पाटील आणि प्रा. अशोक निंबर्गी यांच्यासह अनेकांनी हजेरी लावली.

## महापालिका रोबोटिक मशीनने गटारींची स्वच्छता करणार

सुराज्य/सोलापूर



सेप्टिक टँक व भूमिगत गटारांच्या धोकादायक स्वच्छता करताना शून्य मृत्यूची सुनिश्चिती करण्याच्या उद्देशाने सोलापूर महानगरपालिका विविध उपाय योजना राबविण्यात येत आहेत. या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेकडून आज भूमीगत गटारांच्या धोकादायक स्वच्छता अत्याधुनिक पद्धतीने करणे कामी बँडीकूट रोबोटिक मशीनचे प्रात्यक्षिक घेण्यात आले.

या रोबट मशीनद्वारे अशी काही ठिकाणे आहेत जिथे माणसाला साफसफाई करताना खूप त्रास होतो. यामध्ये मॅनहोल, गटार विहिरी, स्ट्रॉमवॉटर मॅनहोल्स, तेलकट पाण्याची गटार यासारख्या मर्यादित जागांचा समावेश आहे. या ठिकाणी साफसफाई करणाऱ्या लोकांना अनेकदा त्वचेचे आजार होतात आणि त्यांना श्वासोच्छवासाचा त्रासही होतो, पण या साठी रोबोट बनवण्यात आला आहे, जो अशा जागा सहज आणि कमी वेळात स्वच्छ करेल. त्याचे नाव बँडीकूट रोबोट आहे, हे विशेषतः मॅनहोल साफ करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. याचे प्रात्यक्षिक सोलापूर महानगरपालिके कडून घेण्यात आले. यावेळी आयुक्त शितल तेली उगले, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, कार्यकारी अभियंता तथा सार्वजनिक आरोग्य अभियंता विजयकुमार राठोड, सहा. अभियंता रामचंद्र पेंटर तसेच सर्व विभागीय अधिकारी तसेच आवेक्षक व बँडीकूट रोबोटिक कंपनी कडून सागरिका देबनाथ, श्रीपदा सुभेदार उपस्थित होते.

## शिवसेना वर्धापन दिनानिमित्त युवक निर्धार मेळाव्याचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त युवा सेना कॉलेज कक्ष जिल्हाप्रमुख सुजित खुर्द यांनी पुढाकार घेऊन युवक निर्धार मेळाव्याचे आयोजन केलं आहे. १८ जून रोजी शिवस्मारक येथे दु.४ वाजता हा मेळावा होणार आहे.

राज्यातील एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने युवकांसाठी विद्यार्थ्यांसाठी अनेक कल्याणकारी योजना जाहीर केले आहेत. या योजना युवकांपर्यंत पोहोचवण्याचे या निमित्ताने कार्य होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिवाजी सावंत हे असतील तर पदाधिकारी किरण साळी, ओमकार चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती असेल.

पत्रकार परिषदेत ही माहिती देण्यात आली यावेळी उमेश गायकवाड, सागर शितोळे, प्रियदर्शन साठे, अजिंक्य शिंदे आदि उपस्थित होते.

# अतिक्रमण कारवाईच्या निषेधार्थ सराफ व्यापाऱ्यांचा बंद!

## उग्र आंदोलन करण्याचा सराफ असोसिएशनचा इशारा; आ.विजय देशमुखांकडून पाहणी

सुराज्य/सोलापूर

**महापालिका अतिक्रमण विरोधी पथकाने काल शहरातील सराफ बाजार परिसरातील अतिक्रमण हटवल्याच्या निषेधार्थ आज सराफ कट्टा, चाटी गल्ली, मधला मारुती परिसरातील व्यापाऱ्यांनी लाक्षणिक व्यापार बंद केला. महापालिकेने चुकीच्या पद्धतीने कारवाई केली आहे असा आरोप करत संबंधितांवर कारवाई करावी अन्यथा उग्र आंदोलन करण्याचा इशारा सराफ असोसिएशनने दिला आहे.**

सोलापूर महानगरपालिकेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने काल मधला मारुती, सराफ कट्टा फुलबाजार या परिसरातील व्यापाऱ्यांनी दुकानाच्या समोर केलेले अतिक्रमण हटविले. याचा रोष येथील व्यापाऱ्यात असून आज महापालिकेच्या कारवाईच्या निषेधार्थ सराफ बाजार, चाटी गल्ली, मधला मारुती परिसरातील व्यापार बंद ठेवण्यात आला.

व्यापाऱ्यांनी पाडकाम झालेल्या ठिकाणी पुन्हा डागडूजी सुरू केली आहे. महापालिका प्रशासनाने चुकिच्या पद्धतीने कारवाई केली. अनाधिकृत शेड पाडताना अधिकृत इमारतीलाही धक्का पोहोचवला आहे, असा आरोप सराफ व्यापाऱ्यांनी केला.



रस्ते झाले मोकळे....



महापालिका प्रशासनाने या प्रकाराची माहिती घेऊन व्यापारी वर्गाची माफी मागावी आणि याप्रकरणी कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी व्यापाऱ्यांनी केली आहे. दरम्यान, आपापली दुकाने बंद करून व्यापारी कट्ट्यावर बसल्याचे दिसून आले. यावेळी व्यापाऱ्यांनी आपल्या संतप्त भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी सराफ असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश देवरमणी, महेश धाराशिवकर, प्रेम झाड, सिद्धाराम शिवदारे, मोहन डांगरे, प्रताप चव्हाण, राजू पवार, अमित वेर्णेकर, सोमनाथ गवळी आदींसह व्यापारी उपस्थित होते. वनौषधी तसेच सराफ बाजारातील बहुतेक दुकाने बंद ठेवण्यात आली होती. हार,फुले विक्रेत्यांचीही दुकानंही बंद दिसून आली. एरवी गर्दी, गजबज असलेल्या या चौकात आज वर्दळ कमी दिसून आली.

### आज दुपारी आयुक्तांसमवेत बैठक

दरम्यान, सराफ कट्टा परिसरात मनमानीपणे कारवाई करण्यात आली आहे. या संदर्भात चर्चा करण्यासाठी महापालिका आयुक्तांनी गुरुवार दिनांक १५ जून रोजी दुपारी ३ वाजताची वेळ दिली आहे. बेकायदेशीर कारवाई होऊ नये अशी सूचना यावेळी करण्यात येईल, अशी माहिती आमदार विजयकुमार देशमुख यांनी दिली.

### मनमानीपणे कारवाई झाली : आ.देशमुख

आमदार विजयकुमार देशमुख यांनी दुपारी सराफ बाजार परिसर ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी व्यापाऱ्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. दरम्यान, या संदर्भात बोलताना आमदार विजयकुमार देशमुख म्हणाले की, सराफ कट्टा परिसरातील अतिक्रमण महापालिका प्रशासनाने काढले. नियमानुसार असलेले बोर्ड, सीसीटीव्ही कॅमेरे व इतर साहित्याची मोडतोड केली. मनमानीपणे कारवाई झाली. व्यापाऱ्यांनी दोन तास वेळ मागूनही देण्यात आला नाही, असेही आमदार विजयकुमार देशमुख यांनी म्हटले आहे

### प्रशासन दुटप्पी भूमिका घेत आहे : देवरमनी

महापालिका प्रशासनाने रस्त्यावर बसून विक्री करणाऱ्याचे नियोजन करावे. खरोखर अतिक्रमण असेल तर कारवाई अपेक्षित आहे. दुकानासमोरील वाहन पार्किंगचे नियोजन व्यापारी करतील. प्रशासन दुटप्पी भूमिका घेत आहे. अशीच भूमिका ठेवली तर उग्र आंदोलन करण्याचा इशारा सराफ असोसिएशनचे अध्यक्ष गिरीश देवरमणी यांनी दिला आहे.